पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

सोमवार, दि. ०७ जुलै, २०२५ | वर्ष : १३ | अंक : १८१ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ देवराई प्रकल्पात वृक्षारोपण!
४ चर्तुभूज श्रीविठ्ठल रूख्मिणी मंदिरात भाविकांची गर्दी
५ खर्डा इंग्लिश स्कुलला ठोकले कूलुप



पान ८ वर..

# उध्दव - राज मनोमिलन निवडणूकी पर्यंत? मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा घणाघात

## राज ठाकरे यांना जवळ करणे राजकीय सोय असल्याची केली टीका



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन बंधू तब्बल २० वर्षांनंतर वरळी डोममधील मराठी विजय मेळाव्यात एकत्र आले. 'एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी' असा निर्धार उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला, बाळासाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी मराठी माणसाची एकजूट ठेवा, असे राज ठाकरे म्हणाले, कायमचे एकत्र येण्यासाठीचे स्पष्ट संकेत मिळाले, पण तशी घोषणा करण्यात आली नाही. यानंतर या मेळाव्याबाबत राजकीय वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून, भाजप नेते उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ही यावर भाष्य केले आहे.



ते म्हणाले की, लोकशाहीत कोणी कोणावर बोलू शकते. उद्धव ठाकरे २०१९ ला मुख्यमंत्री झाल्यापासून अशा प्रकारची विधाने करत आहेत, जी सामान्य माणसाला आवडत नाहीत. पण उद्धव ठाकरेंना कोण आवरणार? त्याने काही फरक पडत नाही. दोन ठाकरे एकत्र आल्याचा हिंदू माणसाला आनंदच झालेला आहे. परंतु, ठाकरे बंधू किती दिवस एकत्र राहतात. निवडणुकांपर्यंत तरी एकत्र राहतात की त्या आधीच वेगळे होतात, हे काळच ठरवेल, असा टोला ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी लगावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होतेच की, आता उद्धव ठाकरे हे पुढचा मुद्दा मुंबई तोडणार असल्याचाच मांडणार. कसली मुंबई तोडणार? कुणाची हिंमत आहे मुंबई तोडण्याची? आम्ही मेलोत का? मुंबई काही कुणी तोडत नाही. पण, दरवेळेस मराठी माणसांच्या भावनांशी खेळायचे, हिंदी-मराठी विषय असाच केला आहे. मराठी माणूस हुशार झालेला आहे. आतापर्यंत हे दोन्ही भाऊ एकत्र का आले नाहीत, मुंबई महानगरपालिका जाणार असे आता त्यांना दिसू लागले आहे. गेल्या २० वर्षांत कधी राज ठाकरेंना विचारले नाही. आम्हाला कुणीही नको, अशाच मानसिकतेत तुम्ही होतात. दिल्ली गेले, राज्य गेले आणि आता महापालिकाही गेली, तर ठाकरे सगळेच गमावून बसतील, अशी टीका चंद्रकांतदादा पाटील यांनी केली.

दरम्यान, हिंदुत्ववादी माणूस भावनिक आहे. मात्र राजकीय फायद्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आले की कुटुंब म्हणून एकत्र आले, हे पाहावे लागेल. मुंबई महापालिकेतील ठाकरेंचे ७५ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले. आता राजकीय सोय म्हणून उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांना जवळ करत आहे. मुंबई महापालिका ठेवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांना राज ठाकरे आठवले नाहीत, राज ठाकरे यांच्या चिरंजिवाने विधानसभा निवडणूक लढवली, तेव्हा तुम्ही माघार घेतली नाहीत, या शब्दांत त्यांनी निशाणा साधला.

## संक्षिप्त

### पुरात वाहून गेल्याने शेतकऱ्याचा मृत्य

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : वेगरे-निर्गुडवाडी (ता. मुळशी) येथील शेतकरी कोंडिबा रामा मरगळे (वय ७०) यांचा मुठा नदीचे उगमस्थान असलेल्या ठिकाणी पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला. याबाबत सविस्तर घटना अशी की, मरगळे हे आपल्या पत्नीसमवेत वेगरे-निर्गुडवाडी येथे राहतात.

शेती व पशुपालन हा त्यांचा व्यवसाय आहे. नेहमीप्रमाणे मरगळे हे सकाळी ११ च्या दरम्यान जनावरे मुठा नदी परिसरात चारण्यासाठी घेऊन गेले होते. संध्याकाळी जनावरे घरी आली. परंतु, मरगळे आले नाहीत म्हणून त्यांची पत्नी कोंडाबाई मरगळे यांनी शेजारील वस्तीवर याबाबत माहिती दिली. अंधार व जोरदार पावसामुळे त्यांचा शोध लागला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी सदाशिव ढेबे, महादेव कोकरे व त्यांचा मुलगा लक्ष्मण मरगळे यांनी ते ज्या ठिकाणी जनावरे घेऊन गेले होते, त्या परिसरात शोधले असता मुठा नदीपात्रालगतच त्यांचा मृतदेह आढळला. जोरदार पावसामुळे नदी व ओढ्याला जास्त पाणी आल्याने वाहून जाऊन त्यांचा मृत्यू झाल्याचा स्थानिक ग्रामस्थांचा अंदाज आहे. सदर घटनेची माहिती समजताच वेगरे गावच्या पोलिस पाटील यमुना भाऊ मरगळे यांनी याबाबत पौड पोलिसांना माहिती दिली.

मृतदेह सापडलेले ठिकाण टेमघर धरणाच्या आतील बाजूस आहे. या ठिकाणी रुग्णवाहिका जाऊ शकली नाही. परिणामी, मृतदेह नागरिकांना झोळीत घालून नदी पार करीत पौड या ठिकाणी शवविच्छेदनासाठी पाठवावा लागला. शासनाच्या माध्यमातून मरगळे यांच्या पत्नीला मदत मिळावी तसेच वेगरे ग्रामस्थांना मुठा नदीवरील पुलासाठी निधी मंजूर व्हावा, अशी मागणी वेगरेचे माजी सरपंच भाऊ मरगळे यांनी केली आहे.

### कन्हेरगावात बिबट्याची दहशत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

सोलापूर : माढा तालुक्यातील कन्हेरगाव परिसरात गेल्या चार महिन्यांपासून बिबट्याचा वावर असल्याचा प्रत्यय येत आहे. कन्हेरगाव येथे काही ठिकाणी ग्रामस्थांना बिबट्या दिसून आला. कन्हेरगाव शिवारातील सीना-माढा उपसा सिंचनच्या रस्त्यावर तसेच शिवाजी मोरे यांच्या शेतात व महादेव काळे, रामलिंग केदार यांच्या वस्तीजवळ बिबट्या दिसल्याने ग्रामस्थ दहशतीखाली आहेत. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्याचा तावडतोब बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी, ग्रामस्थांतून करण्यात येत आहे.

## 'जेजुरीचा कायापालट करणार' आ. विजय शिवतारे यांची ग्वाही


**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : तीर्थक्षेत्र जेजुरीत १८६८ साली नगरपालिका स्थापन झाली. राज्यकर्त्यांनी लक्ष न दिल्याने जेजुरीनगरी विकासापासून दुर्लक्षित राहिली. संकुचित वृत्तीचे लोक सत्तेत राहिल्याने शहराचा विकास होऊ शकला नाही. येत्या चार ते पाच वर्षांत जेजुरी शहराचा कायापालट होईल, असे प्रतिपादन आमदार विजय शिवतारे यांनी केले.

जेजुरी (ता. पुरंदर) गडाच्या पायथ्याशी सुमारे ११ कोटी ६० लाख रुपये खर्चाचे भक्तनिवास व पार्किंग व्यवस्था तसेच शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार शिवतारे यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्त मल्हार नाट्यगृहात आयोजित जनसंवाद कार्यक्रमात शिवतारे बोलत होते.

शिवतारे म्हणाले की, राज्यातील सर्व तीर्थक्षेत्रांचा विकास झाला. मात्र, जेजुरीच्या विकासाकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष झाले. २०१८ साली जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आराखडा मांडला. २०२२ साली तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३४९ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली. १०९ कोटी रुपयांची कामे सुरू झाली. शहरासाठी वीर धरणावरून पिण्याच्या पाण्यासाठी ७८ कोटींची योजना मंजुरी झाली. लवकरच या योजनेचे काम सुरू होत आहे. जेजुरी शहराबाहेर असणारी सरकारी कार्यालये शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू करणे, शहरातून उड्डाणपूल करणे, आठवडे बाजारात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, तांत्रिक विद्यालयाच्या जागेत आयटी पार्क सुरू करणे आदी कामे प्रस्तावित आहेत. शहराचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे शिवतारे यांनी सांगितले. मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांचे काम उत्कृष्ट आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी येथील कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवली आहे, असेही त्यांनी सांगितले.

## कोंढव्यात १५ लाखांची अफू, बिबवेवाडीत ११ लाखांचे मेफेड्रोन जप्त - दोघांना अटक



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरात कोंढवा परिसरात अफू बाळगणाऱ्या राजस्थानातील एका आरोपीला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून १४ लाख ९८ हजारांची अफू जप्त करण्यात आली. बिबवेवाडी भागात अमली पदार्थ विरोधी विभागाने कारवाई करुन एकाकडून ११ लाखांचे मेफेड्रोन जप्त केले.

कोंढवा परिसरात अमली पदार्थ विरोधी पथक गस्त घालत होते. त्यावेळी भैरवनाथ मंदिराजवळ एक जण थांबलेला असून, त्याच्याकडे अफू असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी सचिन माळवे यांना मिळाली होती. त्यानंतर सापळा लावून पोलिसंनी भागीरथराम रामलाल बिष्णोई (वय ४६, रा. टिळेकरनगर, कोंढवा) याला पकडले आहे. त्याच्याकडून १४ लाख ९८ हजार रुपयांची अफू, पिशवी, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा १५ लाख चार हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. बिष्णोई याच्याविरुद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात अमली पदार्थ विरोधी प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली.

बिबवेवाडी भागात अमली पदार्थ विरोधी पथकाने दुसऱ्या एका कारवाई मध्ये पोलिसांनी एकाकडून ११ लाखांचे मेफेड्रोन जप्त केले. विठ्ठल ऊर्फ अण्णा रघुनाथ कराडे (वय ५७, रा. बिबवेवाडी, पुणे) याच्याकडे मेफेड्रोन असल्याची माहिती आझीम शेख यांना मिळाली पोलिसांनी सापळा लावून त्याला पकडले. ११ लाख २ हजार रुपयांचे मेफेड्रोन, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, मोबाइल संच असा ११ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त विवेक मासाळ, सहायक आयुक्त गणेश इंगळे, राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस

निरीक्षक सुदर्शन गायकवाड, प्रशांत अन्नछत्रे, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, पोलीस कर्मचारी योगेश मांढरे, चेतन गायकवाड, संदीप शेळके, नितीन जगदाळे, युवराज कांबळे, दिनेश बास्टेबाड यांनी ही कामगिरी केली.

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शासनाचे सर्वोच्च प्राधान्य : परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : स्कूल बस आणि व्हॅनमधून होणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, या विषयीच्या नवीन नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी वाहनचालक, शिक्षक पालक आणि प्रशासनाने जागरूक राहिले पाहिजे असे मत राज्याच्या परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केले.

पर्वती विधानसभा मतदारसंघातील दोन हजार विद्यार्थ्यांना मिसाळ यांच्या हस्ते शालेय साहित्याचे विनामूल्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात मिसाळ बोलत होत्या. माजी नगरसेवक महेश वाबळे आनंद रिठे यांनी संयोजन केले.



मिसाळ म्हणाल्या, वाहनचालक आणि कर्मचाऱ्यांची दर आठवड्याला अल्कोहोल चाचणी,पोलिस पडताळणी, अपघात किंवा गुन्ह्याचा इतिहास तपासणी, वाहनांमध्ये जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम, सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा, पॅनिक बटन, अग्नी नियंत्रण स्प्रिंकलर, महिला अटेंडंट आदी बाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. स्कूल बसचालकांनी या नियमावलीची जबाबदारीने अंमलबजावणी करावी.

### पवना धरणातून ४०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : पिंपरी-चिंचवडकरांना पाणीपुरवठा करणारे पवना धरण ७२ टक्के भरले आहे. पवना धरणातून चारशे क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी पवना धरणात झपाट्याने पाणीसाठा वाढला आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी केवळ १९ टक्के इतकाच पाणीसाठा उपलब्ध होता. यावर्षी तो ७२ टक्क्यांवर पोहोचला आहे.

यामुळे पिंपरी-चिंचवडकरांची पाण्याची चिंता मिटली आहे. सकाळपासून चारशे क्युसेक पाण्याचा विसर्ग इंद्रायणी नदीपात्रात करण्यात आला.

### लोहगावमध्ये टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील महिलेचा मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : लोहगाव परिसरात भरधाव टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाला. अपघातात दोन लहान मुले जखमी झाली. रुक्मिणी राजू चव्हाण (वय २९, रा. वडगाव शिंदे रस्ता, लोहगाव ) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अपघातात चव्हाण यांची दोन लहान मुले जखमी झाले. याबाबत राजू चव्हाण (वय ३३) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार राजू, त्याची पत्नी रुक्मिणी आणि दोन मुले लोहगाव भागातून ४ जुलै रोजी रात्री अकराच्या सुमरास निघाले होते. धानोरी जकात नाक्याजवळ भरधाव टेम्पोने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी रुक्मिणी आणि त्यांची दोन मुले जखमी झाली. रुक्मिणी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी मुलांसह रुक्मिणी यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचारांदरम्यान रुक्मिणी यांचा मृत्यू झाला. मुलांवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अपघातानंतर पसार झालेल्या टेम्पोचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस तपास करत आहेत.


## भूसंपादन हरकतींवर सुनावणी पूर्ण

### पुरंदर विमानतळासाठी अद्याप काही शेतकऱ्यांचा विरोध कायम

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनासाठी सात गावांमधील शेतकऱ्यांकडून जिल्हा प्रशासनाच्यावतीने मागविण्यात आलेल्या हरकती - सूचनावरील सुनावण्या पूर्ण झाल्या आहेत. काही शेतकऱ्यांनी विमानतळाला आपला विरोध कायम असल्याचे पुन्हा एकदा सांगितले आहे.

प्रस्तावित विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधून सुमारे २ हजार ६७३ हेक्टर जमिनींचे भूसंपादन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने भूसंपादनासाठी ३२ (२) च्या नोटिसा शेतकर्यांना देण्यात आल्या. या नोटिसनंतर शेतकऱ्यांना हरकती सूचना नोंदवायला सांगितले होते. सात गावांमधील शेतकऱ्यांकडून दोन हजार ५२ हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. त्यावर भूसंपादनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकडून या सुनावण्या घेण्यात आल्या. नऊ जूनपासून सुनावणीला सुरुवात झाली होती. साधारण महिनाभर सुनावण्या चालल्या. या वेळी अनेक शेतकऱ्यांनी विमानतळाला पाठिंबा दर्शवला.



सरकारने भूसंपादनाच्या मोबदल्यात पैशांसोबत जमीन द्यावी, अशी मागणी केली. सरकारने लवकरच पॅकेजची घोषणा करावी, असेही सांगितले. तर दुसरीकडे काही शेतकऱ्यांनी भूसंपादनाला विरोध कायम ठेवला आहे. कुठल्याही किंमतीत जमिनी सरकार देणार नसल्याचे सांगितले. सुनावणीनंतर जिल्हा प्रशासन आणि सरकार काय भूमिका घेणार, याकडे शेतकर्यांचे लक्ष लागले आहे.

भूसंपादन, तसेच जमिनींचा मोबदला ठरविण्यासाठी त्या जमिनींची मोजणी आवश्यक आहे. तीन मे रोजी जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आला होता. मात्र, गावकऱ्यांनी आंदोलन करीत त्याला जोरदार विरोध केला. त्यामुळे सर्वेक्षण थांबविण्यात आले होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठक घेऊन सर्वेक्षण थांबवण्याची सूचना केली. भूसंपादनासाठी त्या जागेचे सर्वेक्षण आणि मोजणी करण्याची आवश्यकता आहे, या सुनावण्यांनंतर प्रशासन मोजणीला सुरुवात करेल का?, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या हरकतींची सुनावणी झाली असली, तरी अनेक महत्वाचे मुद्दे अजूनही अनुत्तरित आहेत. मोबदला किती आणि कसा दिला जाईल? पुनर्वसनाची योजना असेल का? मोजणी कधी होईल, अशा प्रश्नांची उत्तरे अद्याप शासनाकडून आलेली नाहीत.

पुरंदर विमानतळासाठी एमआयडी ॲक्टनुसार, भूंसपादन केले जात आहे. यानुसार केवळ मोबदला दिला जातो. त्यात जमीन किंवा पुनर्वसन केले जात नाही, तर दुसरीकडे अनेक शेतकऱ्यांनी मोबदल्यासह जमीन मिळावी, अशी मागणी केली आहे. याबाबत सरकार काय निर्णय घेणार याकडे सगळ्यांचे लक्ष आहे.

# अग्रलेख : आठवडाभर अधिवेशनाचे फलित काय?

शेतकऱ्यांचे प्रश्न, शक्तिपीठ महामार्गाला विरोध अशा विविध मुद्द्यांवर आवाज उठवत अधिवेशनाला सुरुवात झाली. या गदारोळात सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांचे काय? अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याचे फलित जनतेला काय मिळाले? याचा विचार होणे गरजेचे आहे.

दर्जेदार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते, मुबलक पाणी, कचरामुक्त राज्य याच सर्वसामान्य जनतेच्या माफक अपेक्षा. आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे यासाठी मोठ्या विश्वासाने मतदारराजा लोकप्रतिनिधींना निवडून विधानसभेत पाठवतो. जनतेच्या प्रश्नांवर वेळोवेळी बैठका, चर्चा होते. जनतेच्या प्रश्नांवरून लोकप्रतिनिधी सरकारी यंत्रणेवर बरसतात; मात्र जनतेचे प्रश्न 'जैसे थे' राहतात. जनतेचे प्रश्न, राज्यातील दुर्घटना, भ्रष्टाचार यावर अधिवेशन काळात विरोधक जोरदार आवाज उठवतात. सध्या राज्याचे पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. ३० जूनपासून अधिवेशनाला सुरुवात झाली असून, आठवड्याच्या पहिल्या पाच दिवसांत फक्त अन् फक्त आरोप-प्रत्यारोप. बाकी जनतेच्या समस्या कायम आहेत. अधिवेशनामुळे राज्यातील जनतेला काय मिळते आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

निवडणुका जवळ आल्या की, जनतेचे आम्हीच कैवारी असा टेंभा सर्वच राजकीय पक्षांकडून मिरवला जातो. त्यात यंदाचे वर्षही निवडणुकीचे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत या निवडणुका पुढील तीन ते चार महिन्यांत पार पडणार आहेत. सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असून मुंबई महापालिका निवडणुकीआधीचे हे आताचे अधिवेशन. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य असणार आहे. सोमवार, ३० जूनपासून अधिवेशनाला सुरुवात झाली. जनतेच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधी आक्रमक भूमिका घेत असल्याचे दिसून येते. जनतेच्या प्रश्नांवरून सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर तुटून पडतात, आजच समस्यांचे निवारण होईल, असे चित्र निर्माण होते; मात्र आरोप-प्रत्यारोप करण्यात दिवसभराचे कामकाज संपते आणि जनतेचे प्रश्न वेटिंगवरच राहतात. राज्यात महायुतीचे हे तिसरे अधिवेशन. डिसेंबर २०२४मध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन, फेब्रुवारी २०२५ मध्ये मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशन आणि आता तिसरे पावसाळी अधिवेशन मुंबईत. विधिमंडळाच्या सभागृहात व परिषदेत राज्यातील १३ कोटी जनतेचे प्रश्न मांडत त्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळवणे हा अधिवेशनाचा मुख्य उद्देश; मात्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेचा मिळालेला कौल महाविकास आघाडीच्या नेत्यांना पटलेला नाही. त्यामुळे महायुतीचे एखादे प्रकरण बाहेर पडताच मविआ नेते महायुतीवर तुटून पडतात. विधानसभा, विधान परिषद, विधिमंडळाच्या पायऱ्यांवर मविआचे नेते महायुतीवर आरोपांच्या फैरी झाडतात. आरोप- प्रत्यारोप केले जातात, विरोधक आरोप करतात, सत्ताधारी आरोप फेटाळून लावतात. यातून निष्पन्न काहीच होत नाही. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात सर्वपक्षीय नेतेमंडळींकडून सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर हवा तसा आवाज उठवला जात नाही.

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने 'लाडकी बहीण' योजना सुरू केली. प्रत्येक महिलेला दर महिना दीड हजार देण्याचा निर्णय घेतला आणि अंमलबजावणीला सुरुवात केली. ऐन विधानसभा निवडणुकीत दीड हजार रुपयांवरून दोन हजार १०० रुपये हे करण्याचे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले; मात्र, निवडणुका होताच राज्य सरकारने या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची छाननी सुरू करून अपात्र बहिणींना योजनेतून वगळण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत नऊ लाखांहून अधिक बहिणी अपात्र ठरल्या आहेत. विरोधकांनी यावरून सरकारवर टीका केली. हा मुद्दा आक्रमकपणे विरोधक अधिवेशनात लावून धरत महायुतीची कोंडी करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोप-प्रत्यारोप यात आठवड्याचे अधिवेशन गुंडाळले अन् सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जैसे थे राहणार हे कटू सत्य कोणी नाकारू शकत नाही. राजकारणाचा पॅटर्न हळू-हळू बदलतोय. आधीच्या राजकारणात सामाजिक उपक्रम राबवणे, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी भांडणे आणि न्याय मिळवून देणे ही जबाबदारी लोकप्रतिनिधी पार पाडत होते. परंतु आता राज्यकर्त्यांनी राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची परंपरा आणली आहे. २० टक्के राजकारण अन् ८० टक्के समाजकारण हे वाक्य आता बदलत आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वतःसाठी अधिक, असे एकूण चित्र दिसते. पावसाळी अधिवेशनाचा पहिला आठवडा संपला असून, यात सत्ताधाऱ्यांविरुद्ध विरोधक एकमेकांवर समोर उभे ठाकले. शेतकऱ्यांचे प्रश्न, भ्रष्टाचार या मुद्द्यावर आवाज उठवणे काळाची गरज असून, आवाज उठवला जातो, सत्ताधारी पक्षाचे मंत्री आश्वासनही देतात; मात्र पुढे काय, भ्रष्टाचाराची चौकशी, अहवाल यात सगळे शांत होते. अधिवेशनात सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढावा यासाठी सत्ताधारी व विरोधक यांनी निदान प्रयत्न तरी करावा, हीच सर्वसामान्य जनतेची माफक अपेक्षा आहे.

## अंतरंग

### रवींद्र चव्हाण कार्यकर्ता ते पक्षाध्यक्ष

चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर भाजपाचा प्रदेशाध्यक्ष कोण होणार याची चर्चा सुरू होती. मंत्रिमंडळ विस्तारात रवींद्र चव्हाण यांना स्थान देण्यात न आल्याने त्यांच्याच नावाची शक्यता अधिक होती. अखेर भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू, माजी मंत्री आणि विद्यमान प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली अन् रवींद्र चव्हाण हे भाजपाचे १२वे प्रदेशाध्यक्ष ठरले... निवड झाल्यानंतर, एक सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता, भाजपाचा अध्यक्ष होतो, हे कुठल्याच पक्षात होणार नाही. त्यामुळे हे माझ्यावर उपकार आहेत. भारतीय जनता पार्टीची राष्ट्रवादाची विचारधारा तसेच मोदी सरकारचे लोकोपयोगी निर्णय राज्याच्या कानाकोपऱ्यांत जाऊन सामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांच्या साथीने पार पाडेन,' असे ते म्हणाले. तर भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या रूपाने तळागाळातील हाडाचा कार्यकर्ता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे. भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपामध्येच शक्य आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचे कौतुक केले. आ. रवींद्र चव्हाण यांचे गेल्या काही वर्षांतील भारतीय जनता पक्षाचा 'कार्यकर्ता' म्हणून असलेलं कार्यच त्यांना प्रदेशाध्यक्षपदापर्यंत घेऊन गेले आहे. भारतीय जनता पक्षाच्या पक्षीय कार्यामध्ये आ. रवींद्र चव्हाण युवामोर्चापासून कार्यरत होते. पक्षीय स्तरावर प्रदेश भाजपाचे महामंत्री म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम पाहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेत वाढलेल्या आ. रवींद्र चव्हाण यांनी नेहमीच पक्षाला अग्रस्थानी ठेऊन काम केले. भाजपा युवा मोर्चा, प्रदेश महामंत्री या पदांवर काम करताना आ. रवींद्र चव्हाण यांनी पक्षीय काम करताना भाजपा कसा वाढेल यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे साहजिकच कोकणातील एक व्यक्ती मुंबईत जाऊन स्थिरावतो. निव्वळ स्थिरावतोच असं नाही तर मुंबईतील डोंबिवली भागात डोंबिवलीकरांना सोबत घेत डोंबिवली-कल्याण महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम केले. त्यानंतर आ. रवींद्र चव्हाण यांना डोंबिवलीचे आमदार होण्याची संधी मिळाली. महायुतीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांना संधी दिली गेली. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून संधी मिळाली तेव्हा त्यांनी कोकणसाठीही निधी उपलब्ध करून दिला. मागील सहा महिन्यांपूर्वीपासून आ. रवींद्र चव्हाण यांना नव्याने स्थापित झालेल्या महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नव्हते. त्यानंतर आ. रवींद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला त्याचवेळी गेली सहा महिने प्रदेशाध्यक्षपदावर आ. रवींद्र चव्हाण यांच्या निवडीच्या चर्चेला खऱ्याअर्थाने पूर्णविराम मिळाला. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदी स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका दिवाळीदरम्यानच्या कालावधीत होण्याची शक्यता गृहीत धरूनच महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष स्वत:च्या पक्षाची रेषा मोठी करण्याच्या प्रयत्नाला लागले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात महायुती व महाविकास आघाडीचं राजकारण आहे. या महायुतीमध्ये राज्यात आपापल्या पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करीत आहेत. महाविकास आघाडीत कोणाचा ताळमेळ कोणातच नाही अशीच काहीशी महाराष्ट्रात आणि कोकण भागात ही स्थिती आहे. महाविकास आघाडीतील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्यासाठी प्रयत्नशील आहे तशी स्वबळाची चर्चाही राज्यात सुरू झाली आहे. अर्थात आजच्या घडीला कोकणाच्या राजकारणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष स्वत:च्या अस्तित्वाच्या शोधात आहेत. मराठीच्या मुद्द्याआडून कोकणातील काही तालुका शहरामध्ये मनसे आणि उद्धव ठाकरे सेनेने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यातूनही महाविकास आघाडीला कोणताही राजकीय फायदा होणार नाही. कोकणातील राजकारण हे सध्या तरी महायुती भोवतीच फिरणारे आहे. महाराष्ट्रात नजीकच्या काळात स्थानिक संस्थांच्या निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी एका कोकणच्या सुपुत्रावर सोपविली आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजितदादा पवार राष्ट्रवादी गट अशा दोन मित्र पक्षांना सोबत घेत प्रदेशाची राजकीय पक्षीय रणनिती आखण्याची मोठी जबाबदारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांच्यावर आहे. अर्थात भारतीय जनता पक्षामध्ये असलेल्या कोअर कमिटी सर्व रणनिती निश्चित केल्यावर त्यावर शिक्कामोर्तब केला जातो असे म्हटले जाते. कोकणात भाजपाबरोबरच एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही आपली ताकद वाढविण्याच्या कामाला लागली आहे. कोकणात सर्वच राजकीय पक्षांना अस्तित्व टिकवून ठेवणं आणि आपलं वर्चस्व नव्हे तर प्राबल्य दाखविण्याचा प्रयत्न सर्वांनाच करावयाचा आहे. स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा जवळ येतील तशीच त्याची अधिक गती वाढणार आहे. आ. रवींद्र चव्हाण मित्रपक्षांना सोबत घेत महाराष्ट्राच राजकारण कशा पद्धतीने करतात हे पाहणं फार औत्सुक्याचं ठरेल.

– साईराज पाटील

## राजकारण

# गरीब वाढताहेत; श्रीमंतांकडे संपत्ती एकवटतेय

**– ना. नितीन गडकरी**



केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गरिबांच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त केली आहे. संपत्ती काही श्रीमंत लोकांच्या हातात केंद्रित होत असल्याचे सांगत पुन्हा एकदा वास्तवाचा आरसा दाखवला आहे. संपत्तीचे विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे, असे केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात एका कार्यक्रमात बोलताना सांगितले, जिथे त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासात शेती, उत्पादन, कर आकारणी आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) यासह अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. गडकरी म्हणाले की, हळूहळू गरीब लोकांची संख्या वाढत आहे आणि संपत्ती काही श्रीमंत लोकांच्या हातात केंद्रित होत आहे. असे होऊ नये. अर्थव्यवस्था अशा प्रकारे वाढली पाहिजे की रोजगार निर्माण होईल आणि ग्रामीण भागाचा विकास होईल.

**संपत्तीचे विकेंद्रीकरण करण्याची गरज**

गडकरी यांनी सांगितले की, आम्ही अशा आर्थिक पर्यायाचा विचार करत आहोत जो रोजगार निर्माण करेल आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना देईल. संपत्तीचे विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे आणि या दिशेने अनेक बदल झाले आहेत. गडकरी यांनी उदारमतवादी आर्थिक धोरणे स्वीकारल्याबद्दल माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव आणि मनमोहन सिंग यांनाही श्रेय दिले, परंतु त्यांनी अनियंत्रित केंद्रीकरणाविरुद्ध इशाराही दिला. ते म्हणाले, आपण याबद्दल काळजी केली पाहिजे. भारताच्या आर्थिक रचनेचा संदर्भ देत, त्यांनी सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) प्रादेशिक योगदानातील असमतोलाकडेही लक्ष वेधले. ते म्हणाले, 'उत्पादन क्षेत्र २२-२४ टक्के, सेवा क्षेत्र ५२-५४ टक्के, तर ग्रामीण लोकसंख्येच्या ६५-७०टक्के सहभाग असूनही, शेती केवळ १२ टक्के योगदान देते.'

**सीए अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन असू शकतात**

यादरम्यान, त्यांनी चार्टर्ड अकाउंटंट्स (सीए) च्या उदयोन्मुख भूमिकेवरही प्रकाश टाकला. गडकरी म्हणाले, सीए अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन असू शकतात. आपली अर्थव्यवस्था वेगाने बदलत आहे. ते फक्त आयकर रिटर्न भरणे आणि जीएसटी जमा करणे इतकेच मर्यादित नाही. पायाभूत सुविधांच्या विकासाबद्दल बोलताना गडकरी यांनी वाहतूक क्षेत्रातील त्यांच्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. रस्ते बांधण्यासाठी 'बांधकाम करा-वापरा-हस्तांतरण' यंत्रणा मीच सुरू केली, असा दावा त्यांनी केला.

**माझ्याकडे निधीची कमतरता नाही, माझ्याकडे कामाची कमतरता**

गडकरी म्हणाले की रस्ते विकासासाठी निधीची कमतरता नाही. कधीकधी मी म्हणतो की माझ्याकडे निधीची कमतरता नाही, माझ्याकडे कामाची कमतरता आहे, ते म्हणाले. सध्या आपण टोल बूथमधून सुमारे ५५ हजार कोटी रुपये कमवतो आणि पुढील दोन वर्षांत आपले उत्पन्न १.४० लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. जर आपण पुढील १५ वर्षे त्याचे चलनीकरण केले तर आपल्याकडे १२ लाख कोटी रुपये असतील. नवीन टोलमुळे आपल्या तिजोरीत अधिक पैसे येतील, असे ते म्हणाले.

### ....नाहीतर मी तुम्हाला सुधारणार : नितीन गडकरी

भंडारा शहरालगत १५ किलोमीटर लांबीच्या बायपास महामार्गाचं शनिवारी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. हा रस्ता वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला. यावेळी वैनगंगा नदीच्या पुलावर असलेल्या या कार्यक्रमाला नितीन गडकरी पोहोचले. त्यावेळी भंडाऱ्याचे एसपी नुरुल हसन यांनी त्यांना सॅल्यूट करत 'जय हिंद सर' म्हटलं. तेवढ्याच तत्परतेनं नितीन गडकरी यांनी एसपी नुरुल हसन यांना नमस्ते म्हटलं. दरम्यान, जिल्ह्यात कडक शिस्तीचा अधिकारी नसेल तर आमदारही सुधारणार नाहीत. भंडाऱ्यातील पोलिस अधीक्षकांना टिकवा, नाहीतर मी तुम्हाला सुधारणार अशी हसत हसत तंबी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शिंदेंचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना दिली.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ आषाढ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायान
मास- आषाढ ऋतु- सौर वर्षा शुक्ल पक्ष
तिथि : द्वादशी २३:१०:३१ नक्षत्र : अनुराधा २५ : ११ : ३३+ योग : शुभ २२ : ०२ : ११ करण : बव १० : १६ : ०२
करण : बालव २३ : १० : ३१ सूर्य : मिथुन चन्द्र : वृश्चिक
हिजरी सन् - १४४५ मुस्लिम मास - मोहरम तारीख - ११
विशेष वामन पूजन

## राशी भविष्य...

**मेष** – व्यवसायात वेळेवर निर्णय घेतले असता फायदा होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवू नका. आज केलेली गुंतवणूक फायदेशीर राहील. कौटुंबिक सुख मिळेल.

**वृषभ** – आळस सोडून कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आर्थिक परिस्थिती मध्यम राहील. पैशाची अडचण जाणवणार आहे. कौटुंबिक सदस्यांकडून सहकार्य मिळेल.

**मिथून** – व्यापारीक वादाचा निपटारा आपल्या बाजूने होईल. वेळेला महत्व द्या. नातेवाइकांशी संबंध सुधारतील. निर्णय क्षमतेचा फायदा होईल. सुखकारक प्रवासाचा योग आहे.

**कर्क** – केलेल्या कामाचे फळ मिळणार नाही. आपल्यावर लोकांचा विश्वास बसेल. मुलांच्या कामावर लक्ष द्या. आर्थिक तंगी राहण्याचे योग आहेत.

**सिंह** – परोपकारी स्वभाव असल्यामुळे दुसऱ्याला मदत केल्यामुळे आनंद मिळेल. व्यापार, नोकरीमध्ये अपेक्षेप्रमाणे घटना घडतील. घरासंबंधी असलेल्या समस्या दूर होतील.

**कन्या** – स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचे योग आहेत. आधिकारी आपल्याला योग्य मार्गदर्शन करतील. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. कौटुंबिक जीवनात मधुरता येईल.

**तूळ** – मित्र, भाऊ यांच्या मदतीने आपली समस्या दूर होईल. कार्यक्षेत्रात वाढ झाल्यामुळे व्यस्त रहाल. आर्थिक योग प्रबळ असल्याने आपली आर्थिक चिंता दूर होईल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**वृश्चिक** – व्यापारात नवीन योजना कार्यान्वित होतील. मुलांचे शिक्षण, रोजगाराचे प्रश्न सुटतील. रचनात्मक कार्यामुळे फायदा होण्याचे योग आहेत.

**धनू** – सामाजिक कार्यात सक्रिय व्हाल व आपल्याला यश व प्रसिद्धी मिळेल. कौटुंबिक स्थिती चांगली राहील. व्यापारात अनिश्चिता निर्माण होईल. फुटकचा मोठेपणा सोडून द्या.

**मकर** – मुलांचे भविष्य उत्तम असणार आहे. आर्थिक स्थिती देखील मजबूत होईल. नोकरीमध्ये आपला मान राखला जाईल. वाहन, मशनरीचा उपयोग करतांना सावधानी बाळगा.

**कुंभ** – व्यापारामुळे किंवा वैयक्तिक कामामुळे प्रवास घडेल. आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. मुलांच्या बाबतीत गैरसमज निर्माण होतील. धार्मिक भावना वाढीस लागणार आहे.

**मीन** – प्रयत्नामुळे आपल्याला कामात यश मिळेल. वैवाहिक कार्याची रूपरेखा आखाल. कामात व्यवसायात मनासारखी परिस्थिती राहील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

## पारावरचा फड

महायुतीत एकीकडे भाजपकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर हिंदुत्वाचा अजेंडा राबविला जात आहे. त्यासाठी आयात नेते मंत्री नितेश राणे, आमदार गोपीचंद पडळकर यांनी विविध घटना प्रकरणांची निमित्त करून रान तापवायला सुरुवात केली आहे. सांगलीतील विवाहितेच्या आत्महत्या प्रकरण असो वा मशिदीवरील भोंगे काढणे, आक्रमक पवित्रा घेत प्रक्षोभक वक्तव्य करीत आहेत. याचा फटका सोबत असलेल्या अजित पवार राष्ट्रवादी गटाला बसू शकतो याची भीती आहे. कारण मुस्लिम, ख्रिश्चन, दलित समाज नाराज होऊन महाविकास आघाडीकडे जात दुरावू नये याची चिंता आहे. त्यासाठी पक्षनेते व उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कठोर भूमिका घेत भोंग्यांच्या बाबतीत राणे पडळकरांसह भाजपच्या नेत्यांना खडे बोलते सुनाव लागले आहेत. अर्थात दोघांच्या दोन भूमिका म्हणजे एकाने कर मारल्यासारखे दुसऱ्याने कर रडल्यासारखे असा प्रकार आहे. हा दुहेरी भूमिकांचा खेळ न समजण्या इतकी जनता मूर्ख नाही. पब्लिक है ये सब जानती है! या संदर्भात पारावरची चर्चा!

**बाबुराव** : आरं ह्या राजकारण्यांचं काय कळतच नाय बग. एक बोलतोया दुसरा दुसरच बोलतोया.
**पांडूनाना** : आता काय झालं ?
**बाबुराव** : अरे त्या मोदीनं सौगादे मोदी काय वाटली, मला वाटलं भाजपने आता धर्मांधता सोडलीच. पन पुन्यांदा घ्यायचं हिंदुत्वाचं कीर्तान सुरू झालं.
**पांडूनाना** : आता जरा इस्कोटून सांगतुस का ?
**बाबुराव** : अरे बघ नव्ह ते रानेपुत नितेश पुण्यांदा मशीनी वरचे भोंगच काडतो म्हनाय लागल्याती. पडळकर सांगलीत ख्रिस्तावांच हातपाय तोडतो म्हणत्यात. गुन्या गोविंदान नांदणाऱ्यासनी भांडाय लावत्याती.
**पांडूनाना** : ह्यो ह्येंचा राजकारणाचा धंदाच हाय न्हवं.
**बाबुराव** : पन ह्यातनं विचाऱ्या अजित दादा आणि त्याच्या गटाचं हाल आल्याती.
**पांडूनाना** : पण बदत्याल ते कसलं दादा. त्यानी बी भाजपच्या ह्या बोलघेवड्यासनी दादा न खडे बोल सुनावल्याती. ते भोंगबिंग बंद पाडायचं चालणार नाही म्हणत्यात.
**बाबुराव** : अरे पण ह्यांनी नको म्हणून काय हुनार हाय.
**पांडूनाना** : तसं कसं दादांनी त्या किरीट सोमय्यास्नी बजावलया.
**बाबुराव** : पर त्यातनं कुटं सुधारना झाल्या?
**पांडूनाना** : ते बी खर आहे म्हना. अजित दादा तरीबी आपलं घोड रेमाटायचं परयत्न करत्यायाती.
**बाबुराव** : हे सोंग चालनार हाय, ह्येनास्नी वेळेवर आवरलं न्हाय तर ह्यातनं अजित दादाचा आन भाजपचा बी तोरा हुईल. याचं समजत केरडीट ह्या वाचाळवीरासनी जाईल.
**पांडूनाना** : बराबर हाय तुज, क्यूकी पब्लिक हाय सब जानती है.

– अमृत चौगुले

## उपदेश कथा



**कामाची तत्परता...**

राजू एक गरीब इमानदार मुलगा रामलाल नावाच्या जमिनदाराच्या घरी नोकरीस होता. आपले काम तो वेळच्या वेळी करीत असे त्यामुळे त्याला कसलीही चिंता वाटत नसे. एका रात्री जोराचा वारा सुटला. वादळी वाऱ्याचं थैमान सुरू झाले. रामलालची झोप उडाली. तो घाबरला व बाहेर आला. पाहतो तर काय? राजू आरामात ओसरीवर गाढ झोपला होता. राजूच्या अशा बेफिकीर वृत्तीचा त्याला राग आला. त्याला वाटले, आता या वाऱ्याने सारा भुसार उडाला असेल, बैल दावे तोडून पळाले असतील. गवत खळ्यात पसरलेले असेल, या चिंतेने तो सैरावैरा धावू लागला. गोठ्यात गेला तर बैल व्यवस्थित आतमध्ये सुरक्षित जागी बांधलेले होते. गवताची पेंड छपराखाली ठेवली होती. भुशाच्या ढिगाऱ्यावर छप्पर घातले होते. हे पाहून तो प्रसन्न झाला. हे सारे काम राजूने अगोदरच करून ठेवल्याचे त्याच्या लक्षात आले. राजूच्या नियमितपणामुळे त्याला वादळातही सुखाची झोप लागते हे त्याला पटले.

**कथा उपदेश : वेळच्या वेळी काम केल्याने धोका पत्करावा लागत नाही.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

१४५६ – निधनच्या २५ वर्षानंतर जोन ऑफ आर्कला निर्दोष ठरवण्यात आले.
१५४३ – फ्रान्सने लक्झेम्बर्गवर आक्रमण केले.
१६६८ – ट्रिनिटी कॉलेजने सर आयझेक न्यूटनला एम.ए.ची पदवी प्रदान केली.
१७७७ – अमेरिकन क्रांती – हबार्टनची लढाई.
१७९९ – रणजीतसिंहच्या सैन्याने लाहोरला वेढा घातला.
१८०७ – तिल्सितचा तह – फ्रांस, रशिया व प्रशियातील युद्ध समाप्त.
१८४६ – अमेरिकन सैन्याने कॅलिफोर्नियातील मॉंटेरे व येर्बा बोयना काबीज केले.
१८६३ – अमेरिकेत सर्वप्रथम सक्तीची सैन्यभरती. १०० डॉलर भरून मुक्ती मिळवण्याची सोय.
१८९८ – अमेरिकेने हवाई बळकावले.
१९३० – अमेरिकेत हूवर धरणाचे काम सुरू.
१९३७ – चीन-जपान युद्ध – जपानच्या सैन्याने बैजिंगवर चढाई केली.
१९४१ – दुसरे महायुद्ध – अमेरिकेचे सैन्य आइसलँडमध्ये उतरले.

### मंत्रालयात गुटखा; पाचपुतेंची टीका

महायुती सरकारमधील भाजपचे श्रीगोंद्याचे आमदार विक्रम पाचपुते यांनी राज्यात सर्रास कुठेही सहज मिळणारा गुटखा तसेच त्यामुळे होणारी अस्वच्छता यावर मंत्रालयात कागदपत्रके पुराव्यांसह टीका केली. त्यामुळे पाचपुतेंनी विद्यमान सरकारला घरचा आहेर दिला असे जरी वृत्त सर्वत्र प्रसिद्धीस आले असले तरी त्यामागचा कार्यकारण भाव समजून घेणे तितकेच गरजेचे आहे. शासकीय कार्यालयात धुम्रपानास बंदी असताना त्या कार्यालयातील प्रत्येक भिंती या पिचकार्यांनी रंगविल्या गेलेल्या असतात.तर अशा गोष्टींबद्दल ज्यांनी गांभीर्य घ्यावे, अशा मंत्र्याचा वावर असणार्या मंत्रालयातदेखील हिच स्थिती आहे. एकीकडे बंदीचा ठराव प्रस्ताव करून विधीमंडळात अशा ठरावांसाठी वेळ, पैसा खर्च करायचा तर दुसरीकडे याच मंत्र्यांकडून त्याला हरताळ फासतानाचे बोलके चित्र पाचपुते यांनी विधानभवनात दाखवून दिले. केवळ गुटखा व त्यामुळे होणारी अस्वच्छता याबद्दल न बोलता पाचपुते यांनी त्या पाकिटावरील देवतांची तसेच त्यात अंतर्भूत असलेल्या केशराची जाहिरात कशी केली जाते व ती कशी फोल ठरते हे देखील जाहिरातीने दाखवून दिले. सरकारने गुटखाबंदी केली मात्र यापूर्वीच्या सरकारमधील काही मंत्री सुद्धा तंबाखू सेवन केल्याने कर्करोगाचे बळी ठरले आहेत. त्यामुळे शासनाने आता तरी याबद्दल कठोर पावले उचलावीत, असे सुज्ञ जणांचे मत आहे.

– स्वरा माने, मिरज


## जन की बात...

### गुरू-शिष्य परंपरेमुळे देशाला जगात मान

भारतीय संस्कृती ही पृथ्वीतलावरील सर्वात प्राचीन आणि महान संस्कृती मानली जाते. आज जगभरात भारताला जो मान सन्मान आहे तो येथील संस्कृती आणि परंपरांमुळे. भारताचे एका वाक्यात वैशिष्ट्य सांगायचे म्हटल्यास येथील 'गुरु-शिष्य परंपरा' असेच सांगता येईल. आजतागायत या भूमीत गुरु-शिष्याची अनेक उदाहरणे होऊन गेली ज्यांची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली. गुरूंनी आपल्या शिष्याला सर्वोत्तम घडवण्यासाठी घेतलेली मेहेनत आणि गुरूंना भगवंताच्या स्थानी मानून शिष्याने केलेली गुरूंची सेवा आणि त्यांचे आज्ञापालन यांच्या कथा आजच्या पिढीला प्रेरणा आणि संजीवनी देतात. गुरूंचे दोन प्रकार आहेत. जे व्यावहारिक ज्ञान देऊन भौतिक प्रगती घडवून आणतात ते व्यावहारिक गुरू. आपल्या आयुष्यात असे अनेक गुरु मिळतात जे आपल्याला मार्गदर्शन करून व्यवहारातील अनेक प्रतिकूल प्रसंगातून सोडवतात तर दुसरे म्हणजे आध्यात्मिक गुरू जे तुमची आध्यात्मिक प्रगती घडवून आणून तुम्हाला जन्म मृत्यूच्या चक्रातून सोडवतात म्हणजेच आत्म्याचे परमात्म्याशी मिलन घडवून आणतात. हे तुम्हाला साधना सांगून ती तुमच्याकडून ती करवून घेतात. हे तुमच्या प्रापंचिक अडचणी सोडवत नाहीत कारण या अडचणी तुमच्या गत जन्मीच्या कर्मांमुळे आलेल्या असतात आणि त्या या जन्मात भोगल्या नाहीत तर त्यासाठी दुसरा जन्म घ्यावा लागेल हे तुमच्या मनावर बिंबवतात. मनुष्यावर असलेल्या गतजन्मीच्या संस्काराच्या प्रभावामुळे तो मायेच्या अधीन राहून सुखात रममाण होतो, परिणामी त्याला त्याच्या ध्येयाचा विसर पडतो. हे ध्येय लक्षात आणून देण्याचे कार्य गुरू करत असतात. गुरु साधकांकडून साधना करवून घेतात आणि त्याला शिष्याच्या अवस्थेत आणतात. एकदा शिष्यावस्था प्राप्त झाली की गुरु त्याला पुढच्या टप्प्याची साधना सांगतात, त्याला मोक्षाची वाट दाखवतात. गुरूंच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करणारा शिष्य मानवी जन्माचे सार्थक करत. व्यावहारिक जीवनात अडचणींना सामोरे जाण्याचे बळ गुरु देतात त्यामुळे गुरूंचे जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरु शिष्याची भगवंताशी म्हणजेच सुख दुःखाच्या पलीकडील आनंदाशी भेट घडवून आणतात म्हणून शिष्याला गुरु हे सदैव देवाच्या स्थानी असतात.

– जगन घाणेकर, मुंबई

### मराठीस विरोध चुकीचा...




पंखात बळ आल्यानंतर आकाशी झेपावे, आकाशी झेप घेतली तर मातीला नाही विसरावे किंवा याद कर तेरे दिन बचपण के खेला किसके आँगन मै या गीताप्रमाणे राज्यात दोन दिवसांपूर्वी मराठी बोलण्यास विरोध करणार्यांना मनसैनिकांनी प्रसाद दिला. वास्तविक हिंदीसक्ती विरोधी आंदोलन सुरू असताना मराठी बोलणार नाही असे सुनावणे किंवा आम्ही अमूक एका प्रांतांचे असून या दुकानात फक्त हीच भाषा येत असेल तर यायचे असे सुनावणे चुकीचे आहे. ज्या देशात ज्या राज्यात किंवा शहरात आपण तीस वर्षे वास्तव करतो त्याच व्यक्तिने आपण मराठी बोलणारच नाही असा पवित्रा घेणे चुकीचा आहे. कारण या मातीमुळे आपण घडत असताना या मातीतील सर्वच घटकांचा मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असते. मात्र केडियाप्रकरणात नेमके उलटे होताना दिसले.मग राजकारण म्हणून कोणी त्याची पाठराखण तर काहींनी विरोध देखील केला. मात्र ज्या ठिकाणी आपण राहतो तेथील माती, पाणी, संस्कृती यांच्याशीदेखील आपल्याला मिळते जुळते घेणे गरजेचे असते. मात्र केडियांच्या भूमिकेमुळे राज्यातील वातावरण काही काळ गंभीर बनले. त्यामुळे मराठीस विरोध करणे चुकीचे आहे.

– रुपाली पाटील, सांगली

# ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख यांचा ७ जुलै रोजी अकलूज येथे भव्य कीर्तन सोहळा

■ जनप्रवास प्रतिनिधी

इंदापूर : लोकनेते कै. प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने, समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा विजय चौक अकलूज येथे सोमवार दिनांक ७/७/२०२५ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १०.० वाजेदरम्यान होणार आहे.

मागील ९ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने समाज प्रबोधनकार हभप. श्री . निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरीकिर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. याचबरोबर जनसेवा संघटना व सोलापूर जिल्हा तालीम संघाचे वतीने महाराष्ट्र केसरी पै.वेताळ




शेळके यांचा एक लाख रुपयांची देणगी व सन्मानचिन्ह तसेच त्यांच्या आई वडिलांचा संपूर्ण कपड्यांचा आहेर देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

त्याच बरोबर शाहीर राजेंद्र कांबळे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार मिळाले बद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात येणार आहे.

ह.भ.प.श्री.अशोक शिंदे महाराज गुरसाळेकर यांचा कोण होणार महाराष्ट्राचा लाडका किर्तनकार स्पर्धेत उप विजेते झालेबद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात



येणार आहे. यासह विविध संस्थेच्या वतीने लोकनेते कै. प्रतापसिंह मोहिते -पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त अनेक समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले आहेत. तरी सर्व नागरीकांनी वेळेवर उपस्थित राहुन या हरिकीर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ .धवलसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे.

# वाघोलीत टोळक्याची दहशत; भंगार व लाँड्री व्यावसायिकाला मारहाण

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : लोणीकंद मधील दत्त समृद्धी नगर भागात हप्त्याची मागणी न पूर्ण झाल्यामुळे भंगार व्यावसायिकास जबर मारहाण करण्यात आली. विशेष म्हणजे, मारहाणीदरम्यान हस्तक्षेप करणाऱ्या लाँड्री व्यावसायिकालाही दुसऱ्या दिवशी तोंडाला मास्क बांधून आलेल्या तरुणांच्या टोळक्याने दुकानात घुसून मारहाण केली. गुरुवारी (दि. ३ जुलै) रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली असून वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकीन खान नामक भंगार व्यावसायिकाकडे काही तरुणांकडून दर महिन्याला ३ हजार रुपये हप्ता मागण्यात येत होता. हप्ता न दिल्याने या तरुणांनी त्यास लाथाबुक्क्यांनी




मारहाण केली. आपला जीव वाचवण्यासाठी खान पळत लाँड्री व्यावसायिक शिवाजी विक्रम बैठा राजक यांच्या दुकानात गेला. या वेळी शिवाजींनी विचारणा केली असता, गुंडांनी ''उद्या बघून घेतो'' अशी धमकी देत माघार घेतली.

पण दुसऱ्याच दिवशी काही तरुण तोंडाला मास्क लावून लाँड्री दुकानात शिरले आणि शिवाजी बैठा यांना मारहाण करत दुकानातील काउंटर, इस्त्री उपकरणांची तोडफोड केली. या हल्ल्यात एक तरुण स्थानिकांनी पकडला.

पोलिसांनी सुशील भागवत मसाळ, सुरज रवींद्र गायकवाड, कार्तिक उर्फ गणेश गायकवाड, करण वर्मा आणि अन्य ३-४ अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. वाघोली पोलीस ठाणे अधिक तपास करीत आहे. सीसीटीव्ही फुटेजचा तपास सुरू दुकान परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलीस तपासत असून, गुन्हेगारांचे अधिक तपशील समोर येण्याची शक्यता आहे. नागरिकांमध्ये या प्रकारामुळे भीतीचं वातावरण पसरले आहे. स्थानिक प्रशासन व पोलीस यंत्रणेकडून गुन्हेगारीला आळा घालण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पाटस येथे शेतकऱ्यांसाठी आधुनिक पद्धतीने ड्रोन शेतीचे प्रात्यक्षिक संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : येथे अर्जुन ड्रोन कंपनीकडून शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे शेती हा प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आधुनिक शेतीकरीता शेतकऱ्यांनी ड्रोनचा वापर कसा करावा हे दाखविण्यात आले.

दौंड तालुक्यातील पाटस परिसरात मोठ्या प्रमाणात शेती केली जाते. सध्या शेतकरीवर्ग पारंपारीक शेतीसह आधुनिक शेती करण्यावर भर देत आहे. अशावेळी शेतीवर फवारणी करताना अनेकदा तीव्र व घातक कीटकनाशके फवारली जातात. यात खुद्द शेतकऱ्याला देखील त्या कीटकनाशकांचा गंभीर त्रास होण्याचा धोका संभवतो. तसेच संपूर्ण पिकाला एकसारखे औषध फवारले जाईल याचीही शाश्वती नाही. अशावेळी आधुनिक ड्रोन




पद्धतीने औषध फवारणी केल्यास संपूर्ण पिकास एकसारखी औषध फवारणी होऊन शेतकऱ्यांच्या जीवास देखील धोका संभवणार नाही.

दौंड तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायत तालुका कृषी कमिटी प्रमुख सोमनाथ सोडनवर यांच्या विनंतीला मान देऊन शुक्रवार (दि. ४) रोजी आयोजित सदर ड्रोन प्रात्यक्षिक कार्यक्रमाच्यावेळी अर्जुन ड्रोन कंपनीचे मालक तेजस नातू यांच्यासह पाटस व पंचक्रोशीतील सर्व शेतकरी वर्ग, पाटस ग्रामस्थ, विविध कार्यकारी सोसायटीचे सदस्य तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# देवराई प्रकल्पात वृक्षारोपण!

## वाघोली पोलिसांचा पर्यावरण पूरक उपक्रम

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : बकोरी येथील देवराई प्रकल्पात संस्थापक चंद्रकांत वारघडे यांच्या संकल्पनेतून घडणाऱ्या वसुंधरेने पांघरलेल्या हिरव्या शालीचा एक धागा विणण्याचे काम, वाघोली वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय लिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे.

या उपक्रमाद्वारे पोलिसांनी 'एक झाड - एक श्वास' या संकल्पनेला चालना देत नागरिकांनाही वृक्षारोपणासाठी प्रोत्साहित केले. देवराई प्रकल्पात आज लावलेली ही झाडे भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवे श्वास घेऊन येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक लिंगाडे यांनी सांगितले की, ''केवळ कायदा व सुव्यवस्था राखणे एवढेच आमचे कार्य नाही, तर सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमात सहभाग घेणे हीसुद्धा आमची जबाबदारी आहे.तसेच वारघडे यांचे



वृक्षसंवर्धनासाठी सुरू असलेल्या अतिशय उत्कृष्ट कार्याबद्दल लिंगाडे यांनी विशेष कौतुक केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यावर उत्तर देताना वारघडे म्हणाले, वृक्षसंवर्धनात पोलिसांचा सहभाग हा इतरांसाठी प्रेरणादायक आहे व पोलीस प्रशासन समाज प्रबोधनातही पुढाकार घेत आहे, हे अत्यंत स्वागतार्ह आहे.

# ब्लूमिंगडेल स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा भाग असणारी आषाढी एकादशीचा सोहळा १४ नंबर येथील ब्लुमिंगडेल इंटरनॅशनल स्कूल मध्ये जल्लोषात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अतुल बेनके, अमित बेनके तसेच शाळेचे मुख्याध्यापक डॉक्टर हितेश शर्मा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व पालखीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सुंदर अभंगांनी झाली. मानस, मनस्वी व आरूष कुटे यांना हरिपाठाची साथ सर्व शाळेतील विद्यार्थी शिक्षकांनी दिली. कीर्तनाची सेवा छाया चव्हाण मॅडम यांनी पूर्ण केली. समूहगीताने संपूर्ण आसमंत भक्तिमय झाला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुमधुर आवाजातून समूहगीत सादर झाले. विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्काराने संपूर्ण शाळा विठ्ठल-रखुमाईच्या भक्तीत तल्लीन झाले.

पालखी मिरवणूकीसह पायी दिंडीतून टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जयघोष करण्यात आला. यावेळी वारकऱ्यांच्या वेशभूषेत मुलांच्या हातात भगवे झेंडे तर मुलींच्या डोक्यावर तूळशी वृंदावन होते. जय जय राम कृष्ण हरी..ज्ञानोबा माऊली..संत तुकाराम आणि संत



ज्ञानेश्वर महाराज यांच्या अखंड जयघोषाने या प्रांगणात टाळ-मृदुंग वाजवत हरी नामाच्या गजरात पालखी रिंगण घालण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष अतुल बेनके यांनी आजच्या पिढीला वारीचा अभूतपूर्व सोहळा, महाराष्ट्रातील संतांचे कार्य कळावे म्हणून सोहळा खूप महत्त्वाचा आहे. अशीच एकात्मता, एकनिष्ठता, आणि सातत्यपूर्ण कामगिरी अभ्यासात विद्यार्थ्यांनी दर्शवावी असे आवाहन केले. अमित बेनके यांनी ब्लुमिंगडेल मध्ये पंढरपूर अवतरले व अशा चैतन्यमय वातावरणात वरुण राजाच्या साक्षीने छोट्या वारक-यांचा समवेत सोहळा अनुभवला. असे मनोगत व्यक्त केले.

शाळेच्या खजिनदार गौरीताई बेनके यांनी याची देही याची डोळा हा संपूर्ण विठ्ठल सोहळा पाहून डोळ्यांचे पारणे भेटले असे मत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक डॉक्टर हितेश शर्मा म्हणाले की संस्कृती शिक्षण यांची जोड साधून विद्यार्थ्यांमध्ये विठ्ठल भक्तीची भावना जागृत व्हावी म्हणून हा सोहळा खूप मनस्वी आनंद देणारा ठरला. एकंदरीत हा विठ्ठल हरिनामाचा सोहळा सर्वांनी जल्लोषात उत्साहात साजरा केला. सूत्रसंचालनापासून ते आभार प्रदर्शनापर्यंत कार्यक्रमाची धुरा आठवीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# संस्कार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या दिंडीने वेधले लक्ष

■ जनप्रवास प्रतिनिधी

शिक्रापूर : वडजाई नगर शिक्रापूर ता. शिरुर येथील संस्कार पब्लिक स्कूल येथील विद्यार्थ्यांच्या दिंडी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असताना विद्यार्थ्यांच्या पालखी सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

शिक्रापूर ता. शिरुर येथील संस्कार पब्लिक स्कूलचे वतीने वडजाईनगर येथे विद्यार्थ्यांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले असताना काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी ची वेशभुषा साकारली. काहींनी वारकऱ्यांची भूमिका




साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले, दरम्यान सर्व विद्यार्थी, पालक व कर्मचाऱ्यांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात पालखी सोहळ्यात टाळ्यांच्या गजरात सहभाग घेतला.

दरम्यान विद्यार्थ्यांनी गोल रिंगण सोहळा करत फुगड्या व पावल्या खेळत ठेका धरला असताना उपस्थितांनी सुध्दा विद्यार्थ्यांसमोर पावल्या व फुगड्या खेळत मुलांचा आनंद द्विगुणित केला. तर विठ्ठलाची आरती करुन पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# शहा ग्लोबल स्कूल येथे वन महोत्सव व डॉक्टर डे उत्साहात

■ जनप्रवास : प्रतिनिधी

इंदापूर :

मानवी जीवनाची जपणूक तसेच वृक्षांचे संगोपन प्रत्येक व्यक्तीने तंतोतंत करावे. जेवढी जेवढी वृक्षांची लागवड महत्त्वाची. तेवढाच वृक्षांचा सांभाळ देखील गरजेचा आहे. हे तत्व पाळण्याची कृती इंदापूरचे शहा ग्लोबल स्कूल करत असल्याचे गौरवोद्गार काढून मुकुंद शहा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.इंदापूर शहरातील शहा ग्लोबल स्कूल येथे वन महोत्सव व डॉक्टर डे साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने मुकुंद शहा बोलत होते.

यावेळी कर्मयोगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन भरत शहा, इंदापूर नगर परिषदेच्या प्रथम लोकनियुक्त माजी महिला नगराध्यक्षा अंकिता



शहा, वैशाली शहा, डॉ. संजय शहा, डॉ. चिंतामणी पाटील, डॉ.यतीन शिंदे, श्रीमती प्रतिमा शहा,डॉ. बिचकुले यांच्यासह पालक,विद्यार्थी,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते स्कूलच्या प्रणांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षाचे महत्व पटवून देणारे फलक घेऊन रॅली काढली. संस्थेचे विश्वस्त अंगद शहा व रुचिरा शहा यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

डॉ. क्षितिजा यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे व पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे असे आवाहन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची झाडे लावली. आणि आपल्या परिसरातील झाडांची निगा राखण्याची शपथ घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली आणि विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजले. विद्यार्थी सोहम होळकुंदे याने वन महोत्सवा बाबत आपले मनोगत व्यक्त केले. नंदिनी रणदिवे आणि स्वराली शेंडे यांनी वनविषयक कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन शिक्षिका रितू शुक्ला यांनी केले व कार्तिकी पाटील यांनी आभार मानले.

### स्कूलमध्ये सात दिवस वन महोत्सव!

शहा ग्लोबल स्कूल मध्ये एक जुलै ते सात जुलै दरम्यान शाळेमध्ये वन महोत्सव सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या काळात प्रत्येक वर्गाकडून झाडांचे व वनांचे आपल्या जीवनातील महत्त्व पटवून देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती संस्थेचे विश्वस्त अंगद शहा यांनी दिली.

# एस.पी गावडे स्कूल येथे रिंगण सोहळा उत्साहात

■ जनप्रवास : वार्ताहर

टाकळी हाजी : आषाढी एकादशी निमित्त एस. पी गावडे इंग्लिश मीडियम स्कूल येथे पालखी मिरवणूक व रिंगण सोहळा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या पोशाखात दिंडीची मिरवणूक काढली. तसेच मुलींनी नऊवारी साडीच्या वेशात डोक्यावर तुळस गळ्यात टाळ, तुळशीच्या माळा घालून विठ्ठल भजनात रिंगण सोहळा काढण्यात आला. सर्व मुले ही विठ्ठल भक्ती मध्ये तल्लीन झाली होती.

अभंग ,ओव्या ,फुगड्या खेळत विद्यार्थ्यांनी तसेच पालक व शिक्षकांनी देखील या सोहळ्यात सहभाग नोंदवला विद्यार्थ्यांनी फेरीचे नियोजन करत अभंग व टाळ मृदंगाच्या गजरात पालखीचे मिरवणूक काढण्यात आली तसेच विठ्ठल रुक्मिणीचे विधिवत पूजन करण्यात आले.



महाराष्ट्राचे आराध्य दैवत व वारकरी संप्रदाय याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजण्यासाठी या दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रशालेच्या प्राचार्या नीता खामकर यांनी सांगितले. या दिंडी सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन केल्याने संस्थेचे अध्यक्ष सुनिता गावडे व पालकांनी कौतुक केले.यावेळी सर्वांना खाऊवाटप करण्यात आला. या सोहळ्याचे नियोजन प्राचार्या नीता खामकर वंदना गाडेकर सायली काळे , दीप्ती गाडीलकर सृष्टी चौगुले अंकिता घोडे मनीषा भाकरे यांनी केले.

## संक्षीप्त वृत्त

### ट्रीडेन्सकडून पुण्यात नवीन वितरण केंद्राची स्थापना; जागतिक एआय नवोपक्रमाला नवी चालना

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अख) आणि डेटा सायन्स सोल्यूशन्सच्या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ट्रीडेन्सने आज पुण्यात आपल्या नव्या वितरण केंद्राचे उद्घाटन करत भारतात आपल्या विस्ताराच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा गाठल्याची घोषणा केली. हे केंद्र ट्रीडेन्सच्या भारतातील दुसऱ्या सर्वात मोठ्या वितरण केंद्राच्या रूपात विकसित करण्यात येत असून २०२६ पर्यंत येथे १,००० कर्मचाऱ्यांची भर होण्याचा कंपनीचा मानस आहे.

सध्या पुण्यात ट्रीडेन्सचे ४०० कर्मचारी कार्यरत असून येत्या वर्षभरात ६०० ते ८०० नव्या व्यावसायिकांची भर घालण्याचे नियोजन आहे. ही भर ट्रीडेन्सच्या २०२५ च्या महत्त्वाकांक्षी योजनेचा भाग असून, यामध्ये १,७०० कर्मचाऱ्यांची भर घालण्याचे लक्ष्य आहे. कंपनीने जनरेटिव्ह, अजेनेटिक एआय आणि प्रगत डेटा अभियांत्रिकी यासारख्या नव्या तंत्रज्ञानावर केंद्रित रोडमॅप तयार केला आहे.

### वाळकीचे विजय भालसिंग यांना पुण्याचा भारत गौरव सन्मान पुरस्कार जाहीर

■ जनप्रवास प्रतिनिधी



नगर : वाळकी (ता. नगर) येथील येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रात सुरु असलेल्या निस्वार्थ कार्याबद्दल भारत गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. समृद्धी प्रकाशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शांताई फाऊडेशन (पुणे) व हिरकणी महिला विकास संस्था (कोरेगाव भिमा) यांच्या वतीने भालसिंग यांना अभिनेते तेजस बर्वे यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती प्रा. डॉ. बी.एन. खरात यांनी दिली.

रविवार दि.२७ जुलै रोजी पुणे येथील पत्रकार भवनमध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये रंगणार आहे. विविध क्षेत्रात पुरोगामी विचाराने निस्वार्थ कार्य करणाऱ्यांचा सन्मान होणार आहे.

### भिंगार कॅम्पला ११ जुलै रोजी बेवारस वाहनांच्या मुद्देमालाचा उघड लिलाव

■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : शहरातील भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे शुक्रवारी (दि.११ जुलै) रोजी बेवारस वाहनांच्या मुद्देमालाचा उघड लिलावचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक भंगार विक्रेत्यांनी सदर लिलावात सहभागी होण्यासाठी सोमवार (दि. ७ जुलै) रोजी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत संबंधितांकडे अनामत रक्कम जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या आवारात एकूण १८ दुचाकी, ५ तीन चाकी रिक्षा, ७ चार चाकी वाहन असे एकूण ३० बेवारस वाहने व त्यांचे सांगडे बऱ्याच दिवसापासून पडून खराब होत आहे. सदरची वाहने पोलीस ठाण्याचे आवारात बऱ्याच दिवसापासून पडून राहिल्याने जागेची अडचण निर्माण झाली आहे. या वाहनांचे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून लिलावाच्या अनुषंगाने मूल्यांकन करण्यात आलेले आहे.

याबाबत तहसीलदार नगर यांना पत्रव्यवहार करून त्यांनी वाहनांचे उघड लीलाव करण्याची परवानगी दिली आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी ११ जुलै रोजी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे उघड लिलावचे आयोजन करण्यात आलेले आहे.

### न्यू इंग्लीश स्कुल टाकळीभान येथे वृक्षदिंडी उत्साहात




■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाची आषाढी एकादशी निमित्ताने वृक्षदिंडी उत्साहात पार पडली .


यावेळी विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी टाळ मृदुंगाच्या तालावर विविध भजने व गवळणी म्हणत टाकळीभान परिसरात भक्तिमय वातावरण तयार केले . यावेळी विद्यार्थांनी वारकऱ्यांच्या अतिशय सुंदर वेशभूषा तयार केल्या होत्या . या वृक्षदिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला .टाकळीभान मधील पालक, ग्रामस्थ व विद्यालयाच्या हितचिंतकांनी वृक्षदिंडीचे ठिकठिकाणी स्वागत केले .

ही वृक्षदिंडी पार पाडण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर . एम . शिंदे, पर्यवेक्षक एस .एस .जरे, विद्यालयाचे उपशिक्षक ए .ए .पाचपिंड, एस.जी . काळे, एस.पी . पटारे, बी .व्ही . देवरे ,श्रीमती एन .ए . पालवे, श्रीमती यु . डी. सुतार आदींनी परिश्रम घेतले .

# टाकळीभानच्या चर्तुभूज श्रीविठ्ठल रूख्मिणी मंदिरात भाविकांची गर्दी

■ जनप्रवास वार्ताहार

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील पुरातन यादव कालीन व प्रती पंढरपूर ओळखल्या जाणार्या श्री.विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आज रविवार दिनांक ६ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त श्री. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती त्यामुळे दर्शनासाठी मंदिरात सकाळ पासून रांग लागली होती.





येथील श्री. विठ्ठल रूख्मिणी मंदिर हे टाकळीभानसह परिसरातील गावांचे श्रद्धास्थान असल्याने टाकळीभान व परिसरातील श्रीरामपूर, भोकर, खोकर, कमालपूर, घुमनदेव, वांगी, खिर्डी, गुजरवाडी, कारवाडी, बेलपिंपळगाव, पाचेगाव आदी ठिकाणांहून भाविक दर्शनासाठी आले होते. श्रीरामपूर येथील डॉक्टर, वकील, व्यावसायिक यांनी पायी दिंडी काढून श्री.विठ्ठलाचे दर्शन घेतले.

आषाढी एकादशी निमित्त श्रीरामपूर येथील योगेश देशपांडे या भाविकाने एक क्विंटल खिचडीचे वाटप केले. तसेच उपसरपंच कान्हा खंडागळे यांचे वतीने केळी वाटप तसेच रावसाहेब गायकवाड तसेच इतर भाविकांनीही फराळाचे वाटप केले.

पहाटे ४. ३० ते ५ यावेळेत श्री. विठ्ठल रूख्मिणी मातेला गंगाजलाने स्नान व अभिषेक करण्यात आला. ५.३० ते ६ वाजता या वेळेत प्रांताधिकारी किरण सावंत व सौ.मनिषा सावंत यांच्या हस्ते उत्सव मूर्तीची पूजा व आरती करण्यात आली. दुपारी १२ वाजता आरती झाली त्यानंतर भजन झाले.

आरती नंतर प्रांताधिकारी किरण सावंत व सौ.मनिषा सावत यांचा देवस्थान ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष नानासाहेब पवार, सचिव नानासाहेब लेलकर, विश्वस्त बापूसाहेब पटारे, वासुदेव साबळे, सोसायटीचे माजी अध्यक्ष एकनाथ पटारे तसेच भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रांताधिकारी सावंत म्हणाले की, पांडूरंगा भरपूर पाऊस पडू दे व बळीराजाला सुख समृद्धी लाभू दे असे साकडे आपण विठ्ठलाला घातल्याचे त्यांनी सांगितले.

## कै. लालाशेठ बिहानी विद्यामंदिर प्रशालेत विद्यार्थ्यांची भव्य दिंडी मिरवणूक

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : आषाढी एकादशीनिमित्त कै. लालाशेठ बिहारी विद्या मंदिर प्रशाला, राहुरी येथून इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पारंपरिक पद्धतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषा साकारत विठुरायाच्या भक्तीत रंगलेली भक्तीमय दिंडी सादर केली.



मिरवणुकीत टाळ, मृदुंग, पालखी, भगव्या पताका आणि विविध संदेश घेऊन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. इको क्लब अंतर्गत 'एक पेड माँ के नाम', हरीत सेना अंतर्गत 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा', तसेच अमली पदार्थ विरोधी दिन यासारखे समाजोपयोगी संदेश देणारे फलक विद्यार्थ्यांच्या हातात होते, जे नागरिकांचे विशेष लक्ष वेधून गेले. गोकुळ कॉलनीतील विठ्ठल मंदिरात विद्यार्थ्यांनी संत चरित्रावर आधारित कार्यक्रम, भजन आणि सांस्कृतिक सादरीकरण सादर करत वातावरण भक्तीमय केले. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन शुभारंभ संस्थेचे सहसचिव अनुप बिहानी यांच्या हस्ते झाले. शाळेचे मुख्याध्यापक कैलास अनाप, ज्येष्ठ शिक्षक राहुल जगताप आणि इतर शिक्षकांनी मिरवणुकीच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली, असे मत पालकांनी यावेळी व्यक्त केले. शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## नेप्तीत विद्यालयाची ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी दिंडी

■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : नगर तालुक्यातील नेप्ती येथील नेप्ती विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देऊन गावातून दिंडी काढण्यात आली, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जय घोषात, पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थी उत्स्फुर्तपणे दिंडीत सहभागी झाले होते. तर मुली तुलसी वृंदावन घेऊन उपस्थित होत्या. दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी आणि विविध संत-महापुरुषांच्या वेशभूषेत असलेल्या चिमुकल्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीची पूजा केली.

या दिंडीमुळे गावातील वातावरण भक्तीमय झाले होते. यावेळी मुख्याध्यापक महेश जाधव, राजेंद्र झावरे, रामदास फुले, नानासाहेब घोडके, बाबा भोर, गोरक्षनाथ कोतकर, राधिका वामन, श्रद्धा भांड, बाबुलाल सय्यद, शिवाजी जाधव, संतोष खरमाळे शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खूनासह इतर गुन्हे दाखल असलेल्या सागर मोहळकरची नाशिक कारागृहात रवानगी

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : नांगट व खुनशी प्रवृत्ती असलेल्या सागर मोहळकर या आरोपीबाबत जामखेड पोलीसांनी सतर्क होत जामखेड कारागृहात न ठेवता मा. न्यायालयाचे परवानगीने पोलीस बंदोबस्तात नासिक येथील मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे.




सदर आरोपी सागर दत्तात्रय मोहोळकर जामखेडचा रहीवाशी आहे. तो कोणत्याही प्रकारचा काहीएक कामधंदा करत नाही. तो अत्यंत नंगट, धाडसी व खुनशी वृत्तीचा आहे. तो त्याचे साथीदारांचे मदतीने लोकांमध्ये दहशत निर्माण करुन वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे करत असतो. यापूर्वी जेलमध्ये अटक असताना त्याने एका आरोपीचा खुन केला आहे. त्याचेवर जामखेडसह इतर ठिकाणी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.१) जामखेड पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर येथे २६४/२०१९ भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९,३३६,५०४ प्रमाणे २)जामखेड पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर ४५८ / २०२१ भादंवि क. ३२६, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे ३)जामखेड पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर ३६/२०२२ भादंवि क. ३०७, ३२६, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे ४)पंढरपुर ग्रामीण पोलीस ठाणे२०८/२०२२ भादंवि क. ३०२,२०१,३४ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. सागर मोहळकर फरार राहुन त्याचे अस्तित्व लपवत होता. आरोपी सागर मोहळकर हा सेव्हन फिटनेस जिम जामखेड येथे येणार आहे अशी बातमी मिळाल्याने सपोनि. नंदकुमार सोनवलकर, पोसई. किशोर गावडे, पोहेकॉ प्रविण इंगळे, पो.ना. बाघ, पो. ना. सरोदे, पोकॉ घोळवे, पोकॉ पळसे, पोकॉ माने, पोकॉ दळवी, पोकॉ बोराटे, पोकॉ बेलेकर, पोकॉ कोठुळे, यांचे पथक यांच्या पथकाने दिलेल्या सुचनेनुसार आरोपी सागर मोहळकर यास मोठ्या शिताफिने ताब्यात घेतले. मा. न्यायालयाचे परवानगीने पोलीस बंदोबस्तानिशी मध्यवर्ती कारागृह नाशिक येथे रवानगी केली आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त भगवानगडावर अलोट गर्दी



■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : आषाढी देवयानी एकादशीनिमित्त लाखो वारकऱ्यांचे व भगवानभक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र भगवानगडावर भाविकांची अलोट गर्दी झाली होती रविवारी सकाळी भगवानगडावरील विठ्ठल रुक्माई संत भगवानबाबा व भिमसिंह महाराज यांच्या समाधीचे पूजन भगवानगडाचे उत्तरअधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आले आषाढी एकादशीनिमित्त सकाळपासूनच भगवानगडावर विठ्ठल रुक्माई संत भगवानबाबा भीमसिंह महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी दर्शन बारी रांगेत उभे राहून अत्यंत शिस्तबद्ध दर्शन घेतले भगवानगडावर आलेल्या वारकऱ्यांना आषाढी एकादशीनिमित्त साबुदाणा खिचडी महाप्रसाद करण्यात आला होता भगवानगडाचे महंत डॉ.न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवानगडाचे पंढरपूर आळंदी पैठण येथे भव्यदिव्य मठ उभारले आहेत तसेच भगवानगडावर २१ कोटी रुपये खर्च करून भगवानबाबांच्या भक्त आणि ऊसतोडणी कामगारांच्या मदतीने संत ज्ञानेश्वर महाराजांचे भव्य दिव्य मंदिर साकारले जाणार आहे.

## साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रयत्नांनी उतरला डोक्यावरील गाठीचा डोंगर

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : अकोला जिल्ह्यातील अनिकेत भानुदास इंगळे, येथील २१ वर्षीय तरुणाच्या डोक्यावर जन्मजात छोटी असलेली गाठ कालांतराने वाढत जावुन ४.९ किलो वजनाची झाली. डोक्यावर गाठीचा जणु डोंगरच झाला ही गाठ इतकी मोठी होती की ती दूरूनही सहज दिसत होती व रुग्णाच्या सामाजिक,मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर तीव्र परिणाम करत होती. अनेक वर्षांपासून या गाठीसह जगणाऱ्या रुग्णाची ही अवस्था पाहून त्यांच्या जीवीत्वाला होणा-या संभाव्य धोका पाहुन कुठलेही डॉक्टर त्यांची शस्त्रक्रिया करणेस तयार नव्हते. यातुन माझी कशी सुटका होईल हाच एक प्रश्न रुग्णाला कायम सतावत होता यासाठी त्यांनी अनेक नामांकीत हॉस्पिटलचे उंबरठे झिजवले. परंतु गाठ डोक्याला असल्याने जिवीत्वाची जबाबदारी कुणी घेण्यास तयार नव्हते.

शेवटी कंटाळुन त्यांनी साईबाबा हॉस्पिटल शिर्डी येथे धाव घेतली. येथे हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर डॉ.अजिंक्य पानगव्हाणे यांनी त्यांची संपुर्ण तपासणी करुन त्यांचेवर शस्त्रक्रिया करणेचा धाडसी निर्णय घेतला व रुग्णांने व त्यांच्या नातेवाईकांनी संभाव्य धोका पत्करुन ही सहमती दर्शवली.



दि.२५ जुन रोजी ही जटिल शस्त्रक्रिया डॉ. अजिंक्य पानगव्हाणे व भूलतज्ञ निहार जोशी व त्यांच्या सर्जरी विभागाच्या टीमने प्रयत्नांची पराकाष्टा करुन रुग्णांचे जिवीत्वाला कोणताही धोका न होवु देता इतक्या मोठया प्रमाणात वाढलेली ३० ु २.५ से.मी. आकाराची व तब्बल ४.९ किलो वजनाची भलीमोठी संपुर्ण गाठ एकाच वेळेस पुर्णपणे काढली. संपुर्ण शस्त्रक्रिया श्री साईबाबा हॉस्पिटलने पुर्णपणे मोफत केली असुन या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोरक्ष गाडीलकर, (भा.प्र.से) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, भिमराज दराडे, रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक, लेफ्ट कर्नल, डॉ.शैलेश ओक, (से.नि). उपवैद्यकीय संचालक डॉ. प्रितम वडगावे, न्युरो सर्जन, डॉ.मुकुंद चौधरी, जनसंपर्क अधिकारी, सुरेश टोलमारे आदीनी डॉ.अजिंक्य पानगव्हाणे व त्यांच्या संपुर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

# बांधकाम कामगार योजनेचा बाजार मांडलेल्या दलालावंर कारवाई करा : दत्ताभाऊ जगताप

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : लहुजी शक्ती सेना प्रदेश सचिव तथा पुणे जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ जगताप यांच्या वतीने कामगार मंत्री आकाश फुंडकर, कामगार आयुक्त मुंबई, कामगार उपायुक्त यांना इंदापूर तालुक्यासह संपूर्ण राज्यामध्ये बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर झालेल्या बांधकाम कामगार नोंदणी रद्द करण्याबाबत तसेच बांधकाम कामगार सुविधा केंद्र येथील नियमांचे पायमल्ली करणारे कर्मचारी याच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की,मागील काही वर्षापासून शासनाच्या वतीने असंघटित क्षेत्रातील कामगारांना लाभ देण्यासाठी अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे या योजनांचा बऱ्याच प्रमाणात कामगार व त्याच्या पाल्यांना लाभ मिळत आहे. कामगार कल्याण महामंडळातर्फे योजनेचा लाभ घेण्यासाठी असंघटित क्षेत्रातील ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र लागते परंतु लाभासाठी इंदापूर तालुक्यात अनेक जण एकही दिवस बांधकामावर नसतानाही अनेक कंत्राटदाराने आर्थिक लोभापायी बांधकाम कामगाराच्या फॉर्मवर स्वाक्षरी दिलेल्या आहेत. यामुळे इंदापूर तालुक्यात बांधकाम कामगार झाल्याचे चित्र आहे.

लाभ मिळत असल्याने जे बांधकाम कामगार नाहीत असेही श्रीमंत धनदांडगे लोक लोभापाई योजनेचा अर्ज करून लाभघेत आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात इंदापूर तालुक्यात अनेक एजंट सक्रिय झाल्याचे दिसत आहे या दलाल एजंट लोकांचे थेट संबंध इंदापूर तालुका बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांच्याशी असल्याने बोगस प्रमाणपत्र



दाखल करून अनेकांना बांधकाम कामगार बनवली जात आहे.

यामुळे इंदापूर तालुक्यातील कामगार कल्याण मंडळातर्फे योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करून बोगस प्रमाणपत्र दाखल करून जे बांधकाम कामगार बनले आहेत याच्या नोंदणी रद्द करण्यात यावी व ज्या कंत्राटदाराने दलाला मार्फत एकही दिवस कामावर न गेलेल्या श्रीमंत धनदांडगे लोकांना आर्थिक लाभाच्या योजनेसाठी बोगस प्रमाणपत्र दिले आहेत अशा कंत्राटदराची चौकशी करून लायसन रद्द करण्यात यावे.

तसेच इंदापूर तालुका बांधकाम सुविधा केंद्र ज्यांच्या मार्फत चालवले जाते त्या कंपनी/ एजेन्सीचे टेंडर रद्द करण्यात यावे अशा विविध मागणीचे निवेदन त्यांनी दिले आहे. आणि या वरती आपण लवकरात लवकर कारवाई करावी अन्यथा या विरोधात आम्ही मोठे जन आंदोलन उभा करू अशीही यावेळी दत्ताभाऊ जगताप यांनी सांगितले.

# मंडल अधिकाऱ्यांची मनमानी चव्हाट्यावर महसूल कार्यालय 'कमाईचे केंद्र' बनले!

■ जनप्रवास वार्ताहार

टाकळी हाजी : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी महसूल मंडळात सध्या नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. मंडल अधिकाऱ्यांच्या मनमानी कार्यपद्धतीमुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले असून, लाच दिल्याशिवाय कुठलेही काम होत नसल्याचा थेट आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. शासनाचा पगार घेणारे हे अधिकारी जनसेवेऐवजी स्वार्थसिद्धीसाठीच काम करत असल्याची नागरिकांची भावना आहे.

सातबारा उतारा, फेरफार, वारस नोंदी, जात प्रमाणपत्र अशा महत्वाच्या कामांसाठी नागरिकांना सातत्याने हेलपाटे मारावे लागत आहेत. शासनाने प्रत्येक कामासाठी वेळमर्यादा ठरवून दिलेली असताना, ती पाळली जात नसल्याने कामं आठवड्यानंत किंवा महिन्याभराने होतात. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी व्यक्त केलेल्या तक्रारीनुसार, मंडल अधिकाऱ्यांकडून "लक्ष्मी दर्शन" न झाल्यास फाईलवर सही होत नाही. लाच देणे हे जणू बंधनकारक बनले आहे. काम करायचं असेल तर पैसे द्या, नाहीतर पुन्हा या, असेच उत्तर वारंवार दिले जाते, अशी बोचरी टीका स्थानिकांनी केली आहे.

शासनाकडून ऑनलाईन सेवा, डिजिटायझेशन, वेळेचे बंधन असे उपक्रम राबवले जात असताना, मंडल अधिकाऱ्यांची ही दांडगाई लोकशाही व्यवस्थेची थट्टा ठरत आहे. विशेषतः टाकळी हाजी परिसरातील मंडल अधिकारी यांच्याविरोधात अधिक प्रमाणात तक्रारी होत असून, त्यांनीच कार्यालय 'कमाईचे साधन' बनवल्याचा आरोप आहे.

**तहसीलदार यांची भूमिका महत्त्वाची!**

या पार्श्वभूमीवर स्थानिक तहसीलदार यांनी तातडीने कारवाई करणे अपेक्षित आहे. संबंधित मंडल अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती प्रशासनात्मक कारवाई केली जाणार का? हा सध्या सर्वांचा प्रश्न आहे.

**न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच!**

जनतेचा उद्रेक टाळायचा असेल तर महसूल विभागातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी तातडीची आणि ठोस पावले उचलली पाहिजेत. अन्यथा, जनतेच्या सहनशीलतेचा अंत जवळ आलाय! असे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहे.

# विठ्ठल मंदिरात शेतकरी संघटनेच्या वतीने घंटानाद आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : शासनाला शेतकर्यांची कर्ज मुक्तीची सुबुद्धी द्यावी व शेतकर्यांचा सातबारा कोरा व्हावा म्हणून आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला शेतकरी संघटनेच्या वतीने टाकळीभान येथील पुरातन यादव कालीन श्री. विठ्ठल रूख्मिणी मंदिरात दिनांक ५ जुलै रोजी रात्री ७.३० घंटानाद नाद आंदोलन करून श्री. विठूरायाला साकडे घालण्यात आले.



शेतकऱ्यांनी बहूकष्टातून पिकविलेल्या शेत मालाला योग्य असा भाव मिळत नाही. शेती व्यवसाय पूर्णतः तोट्यात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होऊन त्यांचा सातबारा कोरा व्हावा ही मागणी शेतकरी संघटनेनी लावून धरली आहे. आजरोजी संपूर्ण राज्यभर आंदोलने होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीसाठी आषाढी एकादशीला श्री विठ्ठलाने शासनाला सद्बुद्धी देवो, असे साकडे घातले आहे असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी केले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, शेतकरी नेत्या प्रतिभा घोगरे, रुपेश काले, उपाध्यक्ष हरि तुवर, राजेंद्र लांडगे, तालुकाध्यक्ष युवराज जगताप, मेजर अशोक काळे, युवा आघाडी अध्यक्ष शरद आसने, डॉ. रोहीत कुलकर्णी, राजेंद्र कोकणे, नानासाहेब लेलकर, नरेंद्र काळे, डॉ. दादासाहेब आदिक, डॉ. नितीन आसने, ॲड. सर्जेराव घोडे, ॲड. प्रशांत कापसे, संतोष पटारे, सुजित बोडखे, ईश्वर दरंदले, एकनाथ पटारे, अमोल मोढे, सचिन वेताळ, संदीप उघडे, सुरेश काळे, अशोक काळे, शिवाजी पटारे, सुरेश पवार, चंद्रकांत थोपटे आदी शेतकरी उपस्थित होते.

# खर्डा इंग्लिश स्कुलला ठोकले कूलुप

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : जामखेड तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेची सर्वात मोठी असलेली खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा या शाखेत ८ शिक्षक कमी असल्याने तसेच संस्थेकडे अनेक वेळा मागणी करूनही सदर शिक्षक मिळत नसल्याने या शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन लोळगे व ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकले आहे. विशेष म्हणजे या जामखेड कर्जत मतदारसंघाचे आमदार रोहित पवार हे शाळेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. तरिही वारंवार मागणी करूनही या शाळेस ८ शिक्षक मिळत नसल्याने पालक व ग्रामस्थांकडून अश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जामखेड तालुक्यातील जामखेड नंतर खर्डा हे सर्वात




मोठे गाव आहे. येथे असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा या शाखेत पंचक्रोशीतील जवळपास अडीच हजाराहून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु या शाळेत सद्या तरी शिक्षकांची संख्या पुरेशी नाही. मिळालेल्या माहितीनुसार येथे एकूण ८शिक्षकांची कमतरता असून यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने अनेकवेळा निवेदन देऊनही संस्थेने शिक्षक दिलेले नाहीत.

साधारण एक वर्षापासून ८शिक्षक कमी असल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी झालेली आहे. त्यामुळे खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा या शाळेचे शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सचिन लोळगे यांनी लेखी स्वरूपात शिक्षकांची मागणी केली, परंतु कसल्याच प्रकारची दखल न घेतल्यामुळे ते व पालक आक्रमक होऊन काल दि. ६ जूलै रोज शाळेतील मुख्य गेटला कुलूप लावून संताप व्यक्त करण्यात आला. तसेच पालकांकडून शिक्षकांची तातडीने भरती करून विद्यार्थ्यांचे शालेय नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी व लवकरात लवकर शिक्षकांची भरती करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

या अंदोलनावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन लोळगे यांचेसह सविताताई गोलेकर, शितल शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रीगोंदा पोलिसांनी वीस वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला केले अटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : फौजदारी गुन्ह्यातील खटल्याचे सुनावणी कामी न्यायालयात हजर राहत नसलेल्या आरोपीला नॉन बेलेबल वॉरंटमध्ये फरार आरोपी तब्बल वीस वर्षानंतर श्रीगोंदा पोलिसांनी तालुक्यातील वांगदरी गावचे शिवारात सापळा रचुन ताब्यात घेत अटक केली.

आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील लिपंणगाव येथील असुन त्याच नाव शफीक अदम अत्तार असे आहे . फौजदारी न्यायालय श्रीगोंदा यांचेकडील नमुद फौजदारी खटला क्रमांक २०००२३४/१९९९ सरकार विरुध्द शफीक अदम अत्तार या नॉनबेलबल वॉरन्ट मधील आरोपी शफीक अदम अत्तार हा २० वर्षापासुन खटल्याचे सुनावणी कामी न्यायालयात हजर राहत नसल्याने त्यांचे विरुद्ध न्यायालयाने नॉनबेलबल वॉरन्ट काढला होता. त्या अनुशंगाने पोलीस निरीक्षक



किरण शिंदे यांनी पोलिस कॉन्स्टेबल मनोज साखरे व पो.ना ज्ञानेदव भागवत यांना आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार आरोपीचा शोध घेत असताना पोलिस कर्मचारी मनोज साखरे यांना आरोपी शफीक अदम अत्तार हा श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी गावच्या शिवारात येणार असल्याचे खबऱ्याकडून माहिती मिळाल्याने त्यास वांगदरी गावच्या शिवारात सापळा रचुन अटक करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमितत चांगदेव महाराज मंदिरात भाविकांची गर्दी

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : देवशयनी आषाढी एकादशी निमित्ताने भाविकांनी योगीराज चांगदेव महाराज समाधीच्या दर्शन घेतले यावेळी मंदिर परिसरात यात्रा भरली होती. पहाटे योगीराज चांगदेव महाराज व विठ्ठल रुक्मिणी मूर्तीस अभिषेक घालून महापूजा देवस्थानचे विश्वस्त महेश मरुदगण यांच्या हस्ते होऊन मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले गोदावरीच्या पवित्र स्नानाची पर्वणी साधून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती सायंकाळी उशिरापर्यंत दर्शनास भाविकांची उपस्थिती होती भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासनाने योग्य नियोजन केले होते.



काशी विश्वनाथ, दत्तात्रेय, मुक्ताई ज्ञानपीठ, सोमेश्वर या मंदिरात आई भाविकांनी दर्शन घेतले आषाढी एकादशी निमित्त येथील लिटल एंजल्स व रुरल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते दिंडीत विठ्ठल रुक्मिणी ज्ञानेश्वर महाराज तुकाराम महाराज मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांचा उत्साह अनोखा होता वारकऱ्यांच्या वेशभूषेत हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थ्यांनी चांगदेव मंदिर परिसर व बाजारपेठेतील विठ्ठल मंदिरापासून दिंडी काढली होती बाजारपेठेतील विठ्ठल मंदिरात यानिमित्त योगीराज गंगागिरी महाराज भक्त मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले.

# श्रीगोंद्यात गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलीसांचा छापा आ. पाचपुतेंनी मांडला होता विधानसभेत प्रश्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी दोन दिवसांपूर्वी अवैध गुटखा विक्रीवर विधानसभेत महाराष्ट्रात गुटखा बंदी असूनही आपल्या राज्यात गुटखा येतो कसा हा मुद्दा उपस्थित केल्यावर याची गृह विभागाने दखल घेतली आणि श्रीगोंदा घोडेगाव रोडवरील इनामदारवस्तीवर श्रीगोंदा पोलिसांनी गुटका विक्री करणाऱ्या वर छापा टाकून ११ लाखाचा गुटखा वाहन इतर मुद्देमाल जप्त केला आहे अवैध गुटख्याचा धंदा बंद अन्यथा गजाआड व्हा असा इशारा या कारवाईतून दिला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील घोडेगाव रोडवरील इनामदार वस्ती येथे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने शनिवारी सकाळी कारवाई केली यामुळे श्रीगोंदा पोलिसांशी अवैध धंद्यावाल्याशी असलेले संबंध याचाही पर्दाफाश झाला आहे कारवाईत सुगंधी गुटख्याचा साठा व वाहन जप्त करत ५ लाख ५५ हजार ६०० रुपयांचा गुटखा व चार चाकी वाहन असा एकूण ११ लाख ५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी गुटखाकिंग रवी बबन दळवी रा श्रीगोंदा सह तीन आरोपींना अटक केली आहे एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या विशेष कारवाईचे नेतृत्व पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांनी केले. संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली श्रीगोंदा पोलिस स्टेशन कार्यक्षेत्रातील दुसरी कारवाई आहे.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

> श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी गुटखा संदर्भात विधानसभेत चांगला मुद्दा उचलला त्यांची दखल ही शासनाने घेतली तसेच मागील काही महिन्यापुर्वी बनावट पनीर चा मुद्दा उचलला होता याची ही दखल शासनाने घेतली होता परंतु पुढे हा मुद्दा किती दिवस टिकुन राहिला हे माहीत नाही सध्यातरी त्यांनी त्यांच्याच तालुक्यातील श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे व बेलवंडी पोलीस स्टेशनचे भंडारी साहेब या दोन्ही अधिकाऱ्यांना सक्त ताकीद करून तालुक्यातील गुटखा विक्री बंद करावा असा सूर तालुक्यातील सामान्य जनतेतून निघत आहे.

> श्रीगोंदा गुटख्याचा केंद्रबिंदू काष्टी, श्रीगोंदा फॅक्टरी,श्रीगोंदा शहर, मांडवगण तसेच श्रीगोंदा बेलवंडी पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये बेलवंडी ,कोळगाव येथे गुटखा विक्रीचे अड्डे तयार झाले आहेत या अवैध गुटखा विक्रीतून कोट्यावधी उलाढाल होत त्यातुन गुटखाकिंग रात्रीत श्रीमंत होत आहेत. सर्व गुटखाकिंग चे राजकिय नेत्यांशी जवळीक आहे. नेत्यांच्या ताफ्यात गुटखाकिंगच्या गाड्या असतात खर तर गुटखाकिंग ला नेत्यांनी दुर ठेवण्याची गरज आहे. आणि मानवी आरोग्याचा विचार करुन पोलिसांनी गुटखाकिंगच्या मुसक्या आवळण्याची गरज आहे.



# धार्मिक स्थळांच्या विकासातून संस्कृतीचे संवर्धन : आ.आशुतोष काळे

## माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर मंदिर परिसरात विकास कामांचा शुभारंभ

■ जनप्रवास वार्ताहार

कोळपेवाडी : धार्मिक स्थळे श्रद्धा व एकतेचे प्रतीक असून धार्मिक स्थळांचा विकास म्हणजे केवळ सौंदर्यवाढ नसून हा विकास सामाजिक ऐक्य, परंपरा समृद्ध संस्कृतीच्या संवर्धनाचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. धार्मिक स्थळे व तीर्थक्षेत्रांचा विकास समाज मनाच्या जडणघडणीसाठी अत्यंत आवश्यक असून धार्मिक स्थळांच्या विकासातून संस्कृतीचे संवर्धन होत असल्याचे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी केले.

आषाढी एकादशीचा मुहूर्त साधत राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास अंतर्गत माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर महादेव मंदिर परिसरातील सभामंडप व सुशोभीकरण कामाचा शुभारंभ आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, श्री अमृतेश्वर महादेव मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थळ नाही, तर गावातील विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे केंद्रस्थान आहे.




महाशिवरात्र व श्रावण महिन्यात भाविकांची श्री अमृतेश्वराचे दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते. तसेच एकादशीला दुसऱ्या दिवशी होत असलेला प्रदोष कार्यक्रमासाठी देखील मोठ्या संख्येने भाविक येतात. त्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा मिळाव्यात या दृष्टीकोनातून केलेल्या पाठपुराव्यामुळे श्री अमृतेश्वर महादेव मंदिर परिसरातील सभामंडप व सुशोभीकरण कामासाठी ५० लक्ष निधी मिळविला आहे. शिव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री अमृतेश्वर महादेव मंदिराचा सर्वांगीण विकास हा गावाच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माहेगाव देशमुख गावचे सुपुत्र, भारतीय सैन्याच्या पॅराशूट रेजिमेंटमध्ये २८ वर्षे देशसेवा करून ऑ.लेफ्टनंट पदावरून नुकतेच सेवानिवृत्त झालेले वाल्मिक शिवराम पानगव्हाणे यांचा आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ८ तास झोप होत नाहीये? तर झेलावे लागू शकतात हे ५ नुकसान



निरोगी राहण्यासाठी किमान आठ तासांची झोप आवश्यक आहे, हे तर आपल्याला माहितीच असेल. पण जर आपण किमान आठ तासांची झोप घेत नसाल तर आपल्याला कोणते नुकसान झेलावे लागतील हे तर नक्कीच माहीत नसेल. तर चला कमी झोपण्यामुळे होणाऱ्या ५ समस्या जाणून घ्या :-

१. आपण झोपतो तेव्हा आपल्या शरीरात काही सकारात्मक बदल होतात ज्यात आपला विकास, सुधारणा, पेशींचे आराम आणि मानसिक विकास इतर सामील आहे. परंतु पुरेसे झोप होत नसल्यामुळे हे फायदे मिळत नाही.

२. पुरेशी झोप न घेणे आपल्या मानसिक क्षमता आणि स्मरणशक्तीसाठी अत्यंत घातक असल्याचे सिद्ध होतं. आपली स्मृती कमी होत जाते, कदाचित आपल्याला विसर पडण्याचा आजार देखील होऊ शकतो.

३. ताण आणि मानसिक समस्यांचे शिकार सहसा ते लोक असतात, जे पुरेसे झोपत नाही आणि ज्यांच्या मेंदूला योग्य प्रमाणात विश्रांती मिळत नाही.

४. झोप पूर्ण होत नसल्यास शरीर आणि मेंदूला पूर्णपणे विश्रांती मिळत नाही, ज्यामुळे शारीरिक वेदना, क्रॅम्प्स सारख्या समस्या होतात. याव्यतिरिक्त, यामुळे डोके जड होणे तसेच चिडचिड होणे अशा समस्यांना सामोरा जावं लागतं.

५. आपल्या कमी झोपण्याच्या सवयींचा खराब प्रभाव आपल्या पचनतंत्रावर देखील पडतो. आपण पुरेशी झोप न घेतल्यास, पचन शक्ती कमजोर होते, ज्यामुळे आपल्याला पोटाच्या समस्या किंवा कब्ज सारख्या समस्या देखील होऊ शकतात.

# बाळाच्या त्वचेची काळजी घेण्यासाठी काय कराल?

बालपणी आपल्या त्वचेमध्ये वेगाने बदल घडून येत असतात. लहानग्या बाळाची त्वचा, २-३ वर्षांच्या बाळाची त्वचा व संपूर्ण वाढ झालेल्या व्यक्तीची त्वचा यामध्ये आमूलाग्र फरक असतो. जन्मल्यानंतर पहिल्या काही महिन्यांमध्ये सर्वसामान्यतः होणारे हार्मोन्समधील बदल किंवा नाजूक त्वचाछिद्रांमुळे तसेच काही संसर्गामुळे त्वचेवर लाल चट्टे येणे, जळजळ होणे असे प्रकार होत असतात. लहान बाळांच्या त्वचेतील पाण्याच्या प्रमाणात वेगाने चढ-उतार होत असतात, त्यांच्या त्वचेमध्ये नैसर्गिक मॉइश्चरायझिंग घटक कमी असतात, त्यामुळे त्यांची त्वचा बऱ्याचदा शुष्क व कोरडी असते आणि ते आपल्याला जाणवतदेखील नाही. लहान मुलांच्या त्वचेमधून मॉइश्चरायझर कमी होत जाण्याचा वेग मोठ्यांच्या त्वचेपेक्षा दोन पट जास्त असतो. या सर्व कारणांमुळेच लहान बाळांच्या त्वचेची काळजी वेगळ्याप्रकारे घेतली जाणे गरजेचे असते.

ऋतू व हवामान यामध्ये बदल झाले तरी तुमच्या बाळाची त्वचा निरोगी व सतेज राह-ावी यासाठी मदत करू शकतील अशा काही खास गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. जर



तुमच्या बाळाला आंघोळ करताना मजा वाटत असेल तर अगदी निःशंक होऊन बाळाच्या आंघोळीचे प्रमाण वाढवा. यामुळे बाळाला येणारा घाम स्वच्छ होत राहील. पण आंघोळीचे पाणी कोमट आहे याकडे लक्ष द्या.

बाळाच्या आंघोळीचे पाणी जास्त गरम नको व जास्त थंडदेखील नको. बाळासाठी आंघोळ ही आरामदायी असायला हवी. बाळाची आंघोळ हा आई-बाबा व बाळ यांच्यादरम्यानची जवळीक अधिक जास्त घट्ट करण्याची चांगली संधी असते. आंघोळीमुळे बाळ शांत होते, आंघोळीनंतर बाळाला शांत झोप लागते.

आंघोळ ही नुसते पुसून काढण्यापेक्षा किंवा धुवून काढण्यापेक्षा जास्त महत्त्वाची असते व त्यामुळे अनेक फायदे होतात पण त्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने काही खबरदाऱ्या घेतल्या गेल्या पाहिजेत. आंघोळीमुळे बाळ व त्याचे आई-बाबा दोघांनाही मानसिक आरोग्य लाभते. म्हणूनच बाळाच्या आंघोळीसाठी योग्य वस्तूंचा उपयोग केल्यास तुम्ही तुमच्या बाळाची सौम्य व मुलायमपणे काळजी घेऊ शकता.

लक्षात ठेवा, बाळाची त्वचा ३०% जास्त पातळ असते, तिची स्वच्छता राखणे, ती सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे पण ते अतिशय मुलायमपणे केले गेले पाहिजे. म्हणूनच पीएच संतुलित कोमल उत्पादने वापरणे आवश्यक आहे. पॅराबेन फ्री व डाय फ्री क्लीन्जर्स सौम्य असतात आणि त्वचेला जराही न दुखावता मुलायमपणे स्वच्छ करतात.

एखादे उत्पादन निवडताना त्यामध्ये नेमके कोणते घटक पाहिले पाहिजेत:

१. सौम्य व मुलायम

२. त्वचा व डोळ्यांना त्रासदायक नसावे.

३. त्यामध्ये ॲलर्जिक शक्यता नाही हे क्लिनिकली सिद्ध झालेले असावे.

४. पीएच संतुलित फॉर्मुला जो त्वचेच्या सौम्य ॲसिडिक पीएचला (५ ते ७ च्या दरम्यान) अडथळा ठरणार नाही.

५. सौम्य सुवास जो त्रासदायक ठरणार नाही.

बाळांच्या त्वचेची नीट काळजी न घेतली गेल्यास त्याचे तात्पुरते व दीर्घकालीन, गंभीर परिणाम होऊ शकतात. उष्णतेचे लालसर चट्टे, नॅपी रॅश, पाळण्यात खूप वेळ राहिल्याने उठणारे चट्टे, ॲटॉपिक एक्झिमा असे त्रास होऊ शकतात. यापैकी बऱ्याच त्रासांचे मुख्य कारण जंतूंमुळे होणारे संसर्ग, वातावरणातील बदल, घाम असते. हे सर्व टाळण्यासाठी बाळांच्या त्वचेची नीट काळजी घेणे गरजेचे असते.

# तुम्ही मौजमजा कशी कराल...

**पत्ते** : सारे मित्र जमले की, पत्ते खेळायला वेगळीच मजा येते, पत्ते पाहणे, इकडे-तिकडे गेलो तर सबबी तयार असतात. मित्रांमध्ये सारे खपून जाते, हो ना.

**कॅरम** : कॅमर खेळायला हल्ली फारसा वेळ नसतो पण पावसामुळे मित्रांचा ग्रुप जमल्यावर कॅरम खेळायला, विशेषत: क्वीन पटकावण्यासाठी आपसात स्पर्धा करायला वेगळीच मजा येते.



**अंताक्षरी** : तुम्हा मुलांना गाणी ऐकायला, म्हणायला खूप आवडतात, त्यामुळेच एकमताने मागणी होते. खेळताना एखाद्याने चुकीचे वा भसाड्या आवाजात गाणे म्हटले तर सारे त्याच्यावर तुटून पडतात.

**रॅपिड फायर** : हा ही गाण्याचाच गेम आहे. यामध्ये एकाच्या गाण्यातील अधलामधला शब्द निवडून त्यानुसार गाणे गायले जाते.

**ट्रूथ ॲण्ड डेअर** : मित्रांची खेचण्याची ही सर्वांत सोपी पद्धत बाटली फिरवून ज्यांच्याकडे तिचे तोंड येईल त्याला बाकीचे आपल्या इशाऱ्यावर नाचवू शकतात.

**ल्यूडो** : हा जरी जुना गेम असला तरी तुम्हा मुलांना आवडतो. विशेषत: एकमेकांच्या कवड्या वाटेतून हटवण्यास खूपच मजा येते.

**सापशिडी** : हा मुलांमधील आवडता गेम. चार जण एकत्र येताच हा खेळ सुरु होतो.

**राजा,मंत्री,जोर शिपाई** : चिठ्ठ्या बनवून खेळला जाणारा हे गेम खूप मजेशीर असतो. विशेषत: एखाद्याला चोराची चिठ्ठी मिळताच त्याला चिडवायला वेगळीच मजा येते.

**नाव ओळखणे** : काही न बोलता फक्त हातांच्या खुणा करुन आपल्या ग्रुपला चित्रपटाचे नाव ओळखायला सांगणे, यामध्ये खाणाखुणा करताना खूपच गमतीजमती होतात.

**मोबाईल गेम** : जर पाऊस पडत असताना एकटेच घरी असाल तर मोबाईलवर गेम खेळू शकता.

**व्हीडिओ गेम** : पाऊस पडत असताना व्हिडिओ गेम खेळून पाहा आपला वेळ कसा मजेत जातो.

**कॉम्प्युटर गेम** : जर पावसामुळे बाहेर जाऊन क्रिकेट खेळता येत नसेल तर तो आनंद आपण कॉम्प्युटरवर क्रिकेट खेळून घेऊ शकता. तशा इतरही अनेक गेम्स असतात.

# जसजसे वय वाढू लागते...

जसजसे वय वाढू लागते तसतशी महिलांची आपल्या शरीराकडे लक्ष देण्याची प्रवृत्ती कमी होऊ लागते. त्यामुळे त्यांचे शरीर बेढब होऊन वाढत्या वजनावर त्यांचे नियंत्रण राहात नाही. काही महिलांचे वजन प्रसुतीनंतर वाढते, तर काहींचे मध्यम वयात. अशा महिलांनी हलका-फुलका व्यायाम करून आपले वजन राखायला हवे. खाली सांगितलेला व्यायाम करण्यासाठी फक्त २० मिनिटे हवीत आणि हा व्यायाम आठवड्यातून किमान तीन वेळा करावा. सुरुवातीला दीड किलोचे डम्बेल्स वा वजन खरेदी करावे. नंतर ताकद वाढल्यानंतर आपण जास्त वजनाचे डम्बेल्स खरेदी करू शकता.

* बिनहाताच्या खुर्चीवर बसा. कंबर सरळ ठेवून उजवा हात डाव्या खांद्यावर व डावा हात उजव्या खांद्यावर ठेवा. थोडेसे पुढे वाकून उभ्या राहा. याच स्थितीत खुर्चीत बसा. असे आठ वेळा करा.

* एका खुर्चीसमोर उभ्या राहा व आपले हात व दंड समोर करा. हात असेच ठेवीत खुर्चीवर बसा. पुन्हा हात असेच ठेवीत उभ्या राहा. असे आठ वेळा करा.

* दोन्ही हातात डम्बेल्स घेऊन उभ्या राहा. डम्बेल्स एकमेकांसमोर असावेत. हात पसरत वर या. पुन्हा खाली आणा असे आठ वेळा करा.

* हातात डम्बेल्स घेऊन बिनहाताच्या खुर्चीवर बसा. कंबर थोडीशी पुढे वाकवून कोपर वाकवून वर न्या. खाली आणि असे आठ वेळा करा.

* खुर्चीमागे उभ्या राहा. खुर्चीचा आधार न घेता खुर्चीवर हलकासा हात टेकवा. पंजावर उभे राहण्याचा प्रयत्न करा. ३ सेकंद थांबून पूर्णस्थितीत, या असे आठ वेळा करा.

दक्षता – हा व्यायाम सावकाश करा. सुरुवात नेहमी हलक्या वजनांनी करावी. (दीड किलो वज जास्त वाटत असेल, तर अर्ध्या वा एक किलो वजनानेही सुरुवात करू शकता). जर आठ वेळा व्यायाम करूनही थकवा जाणवत नसेल, तर वजन वाढवू शकता. आठवड्यातून तीनपेक्षा जास्त वेळा हा व्यायाम करू नये. यामुळे आपले बेढब शरीर सुडौल होऊ लागेल.

# सूड भावना बाळगू नका?

दोन जिवाभावाच्या मैत्रिणी, ज्या आपली प्रत्येक वस्तू व प्रत्येक गोष्ट एकमेकींना सांगत, देत असत. त्याच आज एकमेकींचे चेहरेही पाहू इच्छित नाहीत. याचे कारण म्हणजे एकमेकींविषयीचा मत्सर. अभ्यासात मागे-पुढे पडण्याच्या विषमतेमुळे त्यांच्यात जो दुरावा निर्माण झाला तो आजपर्यंत टिकून राहिला आहे. या नकारात्मक भावनेमुळे दोघींना ना रात्री झोप येते, ना दिवसा कोणत्याही कामात मन लागते. काहीसं असंच आपलंही आपल्या मैत्रिणीबाबत झालं असेल, तर जरा या टिप्स पाहा.

**प्रथम हे स्वीकारा** : कोणत्याही व्यक्तीविषयी मत्सर वा द्वेष भावना निर्माण होणे ही सामान्य गोष्ट आहे. ती टाळायची असेल, तर प्रथम स्वत:ला जाणा व आपण या भावनेने ग्रस्त आहोत हे मान्य करा.

**आत्मविश्वास वाढवाा** : बऱ्याचदा स्वत:ला इतरांपेक्षा लहान वा कमी समजल्यामुळे माणूस या भावनेच्या आहारी जातो. यासाठी सर्वप्रथम आपला डळमळीत होणारा आत्मविश्वास सावरा. ही गोष्ट आपल्याला विपरीत परिस्थितीतही हिंमत व बळकटी देऊ शकेल. आपला विचार करण्याचा दृष्टीकोनही थोडासा बदला. यामुळे आपल्याला स्वत:त बदल झाल्याचे लक्षात येईल.

**नकारात्मकता टाळा** : एक तर आपण पूर्वीपासूनच नकारात्मक भावनेने ग्रस्त असता. त्यानंतर जर आपण नकारात्मक वृत्तीच्या माणसातच बसाल, तर तुमचा तणाव आणखी वाढेल. यासाठी आपल्या सहवासात तीच माणसे व त्याच गोष्टी येऊ द्या. ज्या आपल्याला आवडतात.

**सूड भावना बाळगू नका** : ईर्ष्येने आपले मनोबळ खूपच वाढते; पण त्याच्या प्लॅनिंगमुळे आपल्या डोक्यात नकारात्मकता जास्त भरु शकते. यात कोठे ना कोठे आपलाच तोटा असतो. सुडाच्या भावनेऐवजी थंड डोक्याने परिस्थितीचा विचार करुनच निर्णय घ्या.

**मैत्रिणींशी गप्पा मारा** : स्वत:ला खोलीत कोंडून घेण्याऐवजी आपल्या परिचितांशी व मैत्रिणींशी गप्पा मारा. त्यातून काही ना काही मार्ग सापडेल.

●●●

# व्यायामानंतर नारळ पाणी प्यायल्याने उर्जा मिळते

नारळाला शुभ फळ म्हणून मानले जाते. नारळ खाण्यात स्वादिष्ट तर आहेच शिवाय औषधी गुणांनीही परिपूर्ण आहे. कच्चा नारळाचे पाणी स्वादिष्ट आणि रुचकर असते. याचा गरही स्वादिष्ट असतो.



नारळाचे पाणी खनिज आणि क्षार यांचे जणू भांडारच. यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि सोडियम ही तत्व असतात. यांच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. याशिवाय यातील व्हिटॅमिन 'सी'मुळे रोगप्रतिकार क्षमता वाढते आणि पचनतंत्र सुरळीत राहाते. बुजुर्ग लोकांसाठी तर हे एक टॉनिक आहे.

नारळपाणी प्यायल्याने ऊर्जा मिळते. उन्हाळ्याच्या दिवसांत नारळाचे पाणी आल्हाददायक आहे. यांच्या सेवनाने तहान तर भागतेच शिवाय थंडावाही मिळतो. उष्माघातापासून बचाव होतो. उन्हाळ्यातील मूत्रसंस्थेशीसंबंधीत विकारांवर नारळपाणी औषधी आहे डिहायड्रेशनमध्ये हे अमृतसमान आहे. नारळपाणी आरोग्य संजीवनी –

- शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी नारळाचे पाणी मददगार आहे. नारळपाणी पेशींपर्यंत ऑक्सिजन आणि पोषकत्व पोहोचविते.
- शरीराचे मेटॅबॉलिज्म वाढविते.

शरीरातील टाकावू पदार्थ शरीराबाहेर उत्सर्जित करते.

- डायबेटीज नियंत्रित ठेवण्यात साहाय्यक आहे.
- कॅन्सरचा धोका कमी करते.
- किडन्या निरोगी राहण्यास मदत करते.

रक्ताभिसरणाची क्रिया व्यवस्थित ठेवते.

- लठ्ठ व्यक्तींसाठी फायदेशीर आहे. यात कार्बोडायड्रेटस कमी असल्याने वजन नियंत्रित राहते.
- व्यायामानंतर नारळ पाणी प्यायल्याने ऊर्जा मिळते.

# आजच्या फॅशन युगात सुंदर दिसण्याला खूप महत्व

सुंदरता आणि स्त्री गेल्या हजारो वर्षांपासून एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत. स्त्रीचं सौंदर्य आणि पुरुषाचा पराक्रम नेहमीच चर्चेचे विषय बनलेले आहेत. पुरुषांच्या पराक्रमावर रूपवान स्त्रिया भाळल्याची अनेक उदाहरणे इतिहासात आढळतात.



आजच्या फॅशनयुगात सुंदर दिसण्याला खूपच महत्व आलं आहे. त्यामुळे ब्यूटी पार्लर्स, हेल्थ क्लब, हर्बल उत्पादने आणि यांत्रिक उपकरणांनी सौंदर्य अबाधित राखण्याचे प्रयोग होत आहेत. सुंदरता आणि स्वास्थ्य ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे लक्षात घ्यायला हवे.

गुलाबाचे झाड कितीही देखणं असलं तरी त्याला खत अन् पाणी दिलं नाही, तर ते सुंदर दिसेल का? त्याला टवटवीत फुलं येतील का? याचा विचार करा. आजच्या काही स्त्रिया चेहऱ्यावर व शरीरावर सौंदर्य प्रसाधनाचं लेपन करतात, पण सौंदर्य आतून उमलायला हवं हेच विसरून जातात. चुकीच्या मार्गदर्शनाने व प्रकृतीची हेळसांड केल्यामुळे सौंदर्याचा ऱ्हास होऊ लागतो. वृध्दत्व वेगाने जवळ येऊ लागते. याला चुकीचा आहार विचार कारणीभूत होत असतो.

प्राचीन आयुर्वेद सांगते की, योग्य आहार घ्या. दिनचर्या रेखीव ठेवा. जागरण टाळा. सहा तासांची सलग झोप घ्या. मन प्रसन्न ठेवा म्हणजे वृध्दत्व दूर राहील. नुसत्या सौंदर्य प्रसाधनाच्या लेपनाने सौंदर्य टिकणार नाही. सुरुकुत्या येत राहतील. कोवळीक नष्ट होईल. रोज किमान १०-१२ ग्लास थंड पाणी पोटात कसे जाईल ते पहा. शरीरातल्या पेशींना पाण्याची गरज असते. त्याच जर तहानलेल्या राहील्या तर तुमचे सौंदर्य ओसरू लागेल.

सुंदर त्वचा, निरोगी केस व सुडौल काया हे सौंदर्याचे मापदंड आहेत. काळी का गोरी हे फार महत्वाचे मानले जात नाही. स्वास्थ्य ठीक असेल, तर जांभूळ त्वचाही चकचकीत व सुंदर दिसते. जुन्या पेशी मरतात, नव्या जन्मतात ही क्रिया जन्मभर शरीरात होत असते.

नव्या पेशी निर्माण व्हाव्यात व त्यात उर्जा असावी यासाठी आपण भोजन करत असतो. केस व त्वचा हे पेशी सदृढ असतील तरच टवटवीत असतात. शरीराला व्हिटॅमिन ए कमी पडले, तर त्वचा कोरडी पडू लागते. कारण त्वचेची छिद्रे बंद होऊ लागतात. घाम येत नाही.मळ त्वचेखालीच साठत राहतो आणि काळे डाग पडू लागतात. व्हिटॅमिन सी शरीराला कमी पडू लागतात. हाडं कमजोर होतात. थकव्यामुळे त्वचेवर परिणाम होतो. ती प्रभावहीन व कोमेजल्यासारखी दिसू लागते. यावर उपाय म्हणजे लोहतत्व शरीरात गेले पाहिजे. दुपारची झोप मोठी नसावी. रोज अर्धा तास व्यायाम करायला हवा.

# मनाचा शिळेपणा घालवा

जीवनात जबाबदारी अनेक मार्गांनी येत असते. लग्न करून संसार थाटणे ही सर्वात मोठी जबाबदारी आहे. गृहस्थाश्रमात कधीही आवेशात आणि अज्ञानात, सहजपणे प्रवेश करू नका; अन्यथा त्यातील संपूर्ण खुमारीच संपुष्टात येईल. अजाणतेपणी आणि आवेशात गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर आपल्यातील ऊर्जेचा दुरुपयोग होऊ शकतो.



परिणामी नातेसंबंधात क्रोध अधिक आणि प्रेम कमी होऊ शकते. अज्ञानात आपण घर उभे केले तर आपले निर्णय परिपक्व व प्रेमपूर्ण राहू शकणार नाहीत. दोन्ही स्थितींमध्ये गृहस्थी एक उपद्रव ठरेल. आपण मानसिक दृष्टिकोनातून नेहमीच नव्याच्या शोधात असतो. या काळात नावीन्य हे मानसिकतेचे काम करीत असते.

अनेक वर्षांपासून सोबत राहूनही जोडीदारामध्ये काही लोकांना शिळेपणा, कमतरता जाणवते. एकसारखे जीवन जगण्यामुळे आकर्षण समाप्त होत असते. त्यामुळे नातेसंबंधात नावीन्य, दूरदृष्टी आणण्याचा प्रयत्न करा. जगाची माहिती ठेवा, परंतु कुटुंबातील सदस्यांची मानसिकता ओळखा, घरात कोणी निश्चयी, कोणी मिळून मिसळून, तर कोणी संकुचित असते. या वृत्तींमध्ये चांगले तेवढे शोधा. जो परमात्म्यावर विश्वास ठेवतो, तो जीवनात चांगले तेवढेच शोधतो. प्रत्येक सदस्याचे मन वेगळ्या विचारात सक्रिय असते. कुणाचा कुणाला पत्ता नसतो. फक्त मनात चांगले विचार आणा. असे मनच शांत असते आणि शांत मनाचे सदस्य असतील तरच घरातही शांतता नांदेल.

# या महिलांकडे असतो सदैव पैसा, कारण की...

पैसा ही प्रत्येकाची महात्पूर्ण गरज आहे. वैदिक काळापासून पैश्याचे महत्व सांगितले गेले आहे. धन प्राप्तीसाठी आवश्यक आहे तुमच्यावर महालक्ष्मीची कृपा असणे. शास्त्रांमध्ये सांगितले गेले आहे कोणत्या महिलांवर महालक्ष्मीची कृपा असते.

शास्त्रानुसार पत्नीला लक्ष्मीचे रूप मानले गले आहे. त्यामुळे महिलासंबंधी काही विशिष्ट नियम तयार केले गेले आहेत.जाणून घ्या कोणत्या महिलांवर सदैव महालक्ष्मीची कृपा असते. महालक्ष्मी कुठे वास करते?



– ज्या स्त्रिया स्वभावाने सत्यवचनी, पतिव्रता, धार्मिक, देवावर विश्वास ठेवतात त्या ठिकाणी महालक्ष्मी वास करते.

– ज्या स्त्रिया घरातील भांडे स्वच्छ ठेवतात, गाईची सेवा करतात, धन-धान्याचा योग्य तो वापर करतात त्यांचा घरातही महालक्ष्मी वास करते.

– ज्या स्त्रिया सत्य बोलतात आणि योग्य वेशभूषा धारण करतात, सद्गुणी, कल्याणकारी, शुद्ध आचार-विचार नियमांचे पालन करतात अशा स्त्रियांवर सदैव महालक्ष्मीची कृपा असते.

# नाटकीपणा उपयोगाचा नाही : क्रोधावर आवर घाला

बाहेरच्या जगात आपल्याकडून होणारे नाटकासारखे वागणे हळू हळू आपल्या स्वभावात उतरू लागते. लोक जगासमोर एक असतात आणि आपल्या आत वेगळे. कधी कधी बाहेरच्या जगातील ताण तणाव आपल्या आत उतरू लागतात. आपला मूळ स्वभाव हरवू लागतो.



काही लोक राग आल्याचा अभिनय करतात. ऑफिसात, मित्रांमध्ये किंवा इतर ठिकाणी प्रसंगी राग आल्याचे नाटक करावे लागते, पण तोच आपला स्वभाव बनण्याची दाट शक्यता असते. काळाच्या ओघात वागणे बदलते आणि स्वभावही बदलण्याची शक्यता असते. आपण आपल्या मूळ स्वभावाप्रमाणेच राहू यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असते.

आपण कधी कधी रागाला येतो, पण तो काही आपला मूळ स्वभाव नाही. बाहेरील राग आपल्या आत उतरू नये यासाठी काय करावे. आपल्या स्वभावात क्रोधाने प्रवेश केला की तो सर्वात आधी आपल्या विचारशक्तीला मारून टाकतो. त्यांनतर संवेदना मृत होतात. संवेदनाहीन मनुष्य म्हणजे पशूच.

बाहेरील जगाला बाहेरच ठेवा. बाहेरील जग आणि आतील जग यात थोडे अंतर असले पाहिजे. हे अंतर म्हणजे दुटप्पीपणा अपेक्षित नाही. दोन्ही गोष्टी भिन्न आहेत, हे ध्यानात घेणे आवश्यक. यावर साधा सरळ उपाय म्हणजे ध्यान. रोज ध्यानासाठी थोडा वेळ काढा. आपल्या कुटुंबासोबत काही वेळ घालवा. थोडा वेळ स्वत:साठीही द्या. एकांतात बसा. एखाद्या मंदिराच्या ठिकाणी किंवा नैसर्गिक स्थानी बसा.

श्रीकृष्णाच्या जीवनाकडे पाहा. जगातल्या सा-या गोष्टी श्रीकृष्णाने केल्या परंतु स्वत:साठीही वेळ काढायचे. गोकुळात असताना स्वत:साठी थोडा वेळ काढायचे. एकटेच वनात किंवा यमुनेच्या किना-यावर बसून बासरी वाजवायचे. संगीतामुळे आपल्या संवेदनांचे पोषण होते. ध्यानामुळे दृढता येते. एकांतामुळे नवजीवन मिळते. जेव्हा आपण स्वत:ला वेळ देवू, स्वत:कडे लक्ष देवू, तेव्हा जगातील बाहेरील आवरण बाहेरच राहील. तुमचे अंतरंग जसे आहे तसे, मूळ रूपात राहील. मन:शांतीचा हा मूलमंत्र आहे.

# शिक्षणानेच श्रेष्ठत्व प्राप्त होते

शिक्षणानेच प्रगतीचा मार्ग सुकर होतो. ज्ञान सतत मिळविणे आणि ते दुसऱ्याला दिले तरी, कमी होत नाही. जीवन समृद्ध होण्यासाठी अशा ज्ञानाचा उपयोग करता येतो. विद्येनेच माणसाला खरे श्रेष्ठत्व प्राप्त होते. कुठलीही असाध्य गोष्ट विद्येच्या सामर्थ्यावर मिळविता येते. ज्ञान-विज्ञान आणि सुसंस्कारामुळे माणसाची उन्नती होते. समाजातील मोठा घटक शिक्षण घेतो. शिक्षणाद्वारे बौद्धिक, भावनिक आणि नैतिक विकास होण्याकरिता शिक्षण घेतले जाते. शिक्षणाद्वारे आत्मविश्वास जागा झाला पाहिजे. शिक्षण म्हणजे स्वतःचा खरा शाश्वत शोध घेण्याचे साधन आहे. शिक्षणाद्वारे आपण स्वतःतील शाश्वत दिव्यतेला समजून घेतले पाहिजे. हे दिव्यत्व समजून घेतल्यानंतरच मनुष्य खऱ्या अर्थाने श्रेष्ठ जीवन जगतो. शिक्षणाच्या सर्वसामान्य कल्पनेपेक्षा खरे शिक्षण काही अधिक आहे. शिक्षणाद्वारे केवळ बौद्धिक विकास अपेक्षित नसतो. त्याद्वारे व्यक्तीचा भावनिक विकास आणि व्यक्तिमत्त्व, चारित्र्यविकासही अपेक्षित असतो. शिक्षण केवळ उथळ नसावे. शिक्षणात सखोलतेने विचार आणि कृती असायला हवी. शिक्षणात सर्जनात्मकता, सर्व व्यवहार करण्याचे सामर्थ्य असते.

श्रेष्ठत्व कशामुळे मिळू शकते, याविषयी आपल्या समाजात कोणाला फारसा विचार करण्याची आवश्यकता भासत नाही. समाजात ही गोष्ट रूढ झाली आहे. श्रेष्ठ बनण्यासाठी प्रत्येकाला समसमान संधी असते. प्रत्येकजण त्याच्यातील श्रेष्ठत्व विकसित करू शकतो.

शिक्षण घेऊन मानव श्रेष्ठ होऊ शकतो. शैक्षणिक पद्धतीद्वारे तो आपले ध्येय साध्य करू शकतो. शिक्षणामुळे माणूस खरोखर समाधानी होतो. पण सर्वचजण शिक्षण समजून-उमजून घेत नाहीत. म्हणून या साधनाचा परिणाम ज्याच्या त्याच्या प्रयत्नांवर आणि हुशारीवर अवलंबून असतो. अनेक अमेरिकन शिक्षणाला मान देतात, परंतु त्यातील काहीजणच त्यामागील हेतू समजून घेतात. शिक्षणामागील हेतू काय, याबाबत अनेकजण अनेक प्रतिक्रिया व्यक्त करू शकतात. पण नेहमीच आपले शिक्षणाविषयीचे विचार उथळ असतात, असे दिसून येते. शिक्षणाच्या हेतूबाबत आपले मत संकुचित असते, ते विशाल व्हायला हवे. माणसाला समाधान देण्याच्या दृष्टीने आपण शिक्षणाकडे वेगळ्या विशाल दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.



शिक्षणात नैतिक आणि आत्मिक विकासाचाही समावेश होतो. आपण शिक्षणाद्वारे माणसाचे अव्यक्त सामर्थ्य व्यक्त व्हावे, इच्छा कोणीच ठेवत नाही. केवळ शिक्षण घ्यायचे म्हणून घेऊ नका. शिक्षणाकडे आदराने पाहायला हवे, नाहीतर चोरही कपटीपणा शिकत असतो, त्याच्यासारखेच ते होईल. आपले अंदाज, आपले निर्णय योग्य होण्यासाठी आपण शिक्षण घेत असतो. पण पारंपरिक मांडणीत समाधान मिळविण्याची इच्छा ठेवतो. आपण नैतिकता टिकवून प्रयत्न करीत असाल तर नक्कीच उत्कृष्ट व्हाल. जगातील मोठ्या व्यवस्थापनांत आणि सामाजिक बाबतींत वैयक्तिक माणूस तुलनेने ठेंगणा पडतो. अशा वेळेस आपण आपल्या मर्यादा समजून घ्यायला हव्यात. आपला आवाका किती, हे माणसाला कळायला हवे. अशा वेळेस आपण बेजबाबदारपणे वागू नये. समाजात वावरताना केवळ स्वतःच्य खुशीचा विचार करू नये. माणसाला स्वातंत्र्य असायला हवे पण स्वातंत्र्य नैतिकतेने बांधील असायला हवे. स्वातंत्र्य नैतिकतेने बांधलेले नसेल, तर असे स्वातंत्र्य आत्मविनाशकारी असते. काहीजण वरवर अत्यंत सभ्यपणा दाखवितात. पण त्यांच्यात सभ्यतेची सखोल जाणीव नसते. माणसाने 'अंतर्बाह्य' सभ्य असायला हवे. जीवनात श्रेष्ठ होण्यासाठी ते आवश्यक आहे. आपला आत्मसन्मान वाढविण्यासाठी माणसाने त्याच्यातील त्रुटींचा आणि विशेष फायद्यांचासुद्धा विचार करायला हवा. या गोष्टी वाटतात तेवढ्या परस्परविरोधी नाहीत. जो माणूस त्याच्या कामात त्याचे श्रेष्ठत्व दाखवून देतो, जो त्याच्या व्यवसायाला मूल्यवान समजतो, त्याला आपण आदर-सन्मान देतो. या सर्व गोष्टी माणसाला पुष्टी देणाऱ्या आहेत. त्यामुळे माणसाला समाधान मिळते. या सर्व गोष्टींत माणसाने वैयक्तिक परिपक्वता प्राप्त केली असेल तरच त्याला आदर मिळतो; तरच तो इतरांचे आकर्षण बनतो. अपरिपक्व माणसाला मान मिळत नाही.

प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपला संपूर्ण विकास करताना देशाचाही विचार करावा. अनेकजण त्यांचा संपूर्ण विकास करण्यात अपयशी ठरतात. कारण ते देशाचा विचार करीत नाहीत. त्यांची वैयक्तिक हानी ही देशाची हानी असते. आपण आपल्या देशावरचे प्रेम सतत जागृत ठेवायला हवे. आपण देशाच्या मानवी संपत्तीचा एक भाग आहोत. ही संपत्ती वाया जाता कामा नये. आपण समाजाचाच एक भाग आहोत. आपली सर्जनात्मक शक्ती, आपले सामर्थ्य, आपला विकास यासारख्या सर्व गोष्टींत समाजाची आपल्याला गरज असते. श्रेष्ठ होण्याची इच्छा ठेवणाऱ्यांनी हे लक्षात असू द्यावे.

मानवाचा संपूर्ण विकास होऊन त्याने श्रेष्ठ व्हावे या उद्देशाने काही जुन्या शैक्षणिक संस्था काम करीत होत्या. त्यात शालेय शिक्षणाशिवाय धार्मिक, राष्ट्रीय शिक्षणही दिले जात होते. तसेच मनुष्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनेही या शिक्षणसंस्था कार्य करीत असत.

आपण समाजाचे महत्त्व समजून घेण्याची सध्या गरज आहे. समाजातील शैक्षणिक संस्था, वैद्यकीय संस्था असे सर्वजण त्यांचा भाग योग्य रीतीने निभावत आहेत. आपण समाजाशिवाय राहू शकत नाही. त्यामुळे आपणही थोडेफार तरी सामाजिक काम करून समाजाचे ऋण फेडायला हवेत. त्यातूनही आपला विकास होईल, आपण श्रेष्ठ व्हाल.

# कमी खर्चात टामटुमीत घर चालवा



जी गृहीणी कमी खर्चात टामटुमीत घर चालवते तीच खरी गृहिणी असते.आपणही हुशारीने पैसा खर्च करून बचतही करू शकता. यासाठी खालील गोष्टी ध्यानात ठेवा.

*सर्वप्रथम आपल्या उत्पन्नानुसार घराचे बजेट बनवा. बजेट तयार करताना सर्व खर्चाची नोंद केल्यानंतरही काही खर्च अचानक उद्‌भवू शकतात हे लक्षात ठेवा. उदा. एखाद्याचा विवाह वा वाढदिवस इ.अशा खर्चांसाठी थोडे पैसे बाजूला ठेवा.

*जर आपले एकत्र कुटुंब असेल,तर कांद्या-बटाट्यासारख्या भाज्या मंडईतून जास्त प्रमाणात खरेदी केल्यास स्वस्तात मिळतात.

*घराचे किराणा सामान बहुधा महिन्याच्या प्रारंभीच एकत्र खरेदी केले जाते.ते नेहमी गरजेनुसारच खरेदी करावे.बऱ्याचदा जास्त खरेदी केल्यामुळे वापरही जास्त केला जातो.

*हल्ली जिकडे तिकडे 'सेल' चे बोर्ड दिसत असतात व स्त्रिया स्वस्तात मिळतात म्हणून अनावश्यक खरेदी करून ठेवतात व नंतर खर्चाचे बजेट ढासळते.

*जर आपले सूट व साड्या जुन्या झाल्या असतील,तर त्या बोहारणीला देण्यापेक्षा त्यापासून आपण सुंदर बेडकव्हर्स बनवू शकता.

*विजेची बिले कमी येण्यासाठी विजेचा वापर लक्षपूर्वक करा.विनाकारण जळत राहणाऱ्या ट्यूब्ज,फिरत राहणारे पंखे आपले विजेचे बील वाढवित राहतील.

*सोन्यात पैसे गुंतवण्यापेक्षा बँकेत वा पोस्टात साठवावेत.

*क्रेडीट कार्डाने खरेदी जरी सोपी झाली असली तरी खर्चही वाढले आहेत.क्रेडीट कार्डाने केल्या खरेदीमुळे बजेट वाढते.

*दरमहा मुलांच्या खात्यात काही रूपये साठवण्याचे ठरवा.त्यामुळे मुलांचे भविष्य भक्कम होईल.

# पावसाळ्यात भिंतीवरील किळसवाण्या पाली क्षणार्धात जातील बाहेर

जवळजवळ प्रत्येकजण पालीला घाबरतो. घराच्या भिंतींवर, स्वयंपाकघरातील भिंतींच्या मागे आणि ट्यूबलाइट्सवर पाली दिसतात. ते सर्वत्र, त्यांना विष देऊन मारण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांना पळवून लावणं हा सर्वोत्तम मार्ग आहे. चांगल्या आरोग्यासाठी घर स्वच्छ ठेवणे खूप गरजेचे आहे. अनेक घरांमध्ये पाली भिंतींवर फिरताना दिसतात. पण काही सोप्या मार्गांनी तुम्ही पालींपासून सुटका मिळवू शकता.आम्ही सांगितलेले 'हे' घरगुती उपाय करा एक पालही पुन्हा घरात दिसणार नाही.

**कांदा लसूण**

कांदा लसूणच्या वासाने घरात पाली येत नाहीत. यासाठी किचनच्या कानाकोपऱ्यात कांदा लसुणचा वापर करून बनवलेला स्प्रे मारावा. यामुळे किचनमधील पाली कायमच्या गायब होतील. कांदा आणि लसुणचा उग्र वास पालींना आवडत नाही.

## 'हे' घरगुती उपाय करा एक पालही पुन्हा दिसणार नाही



याशिवाय किचनच्या कोपऱ्यात तुम्ही कांदा किंवा लसूण पाकळी सुद्धा ठेवू शकता. यामुळे पाली येणार नाहीत.

**अंड्याच्या सालीचा वापर**

नॅप्थॅलीन बॉल्स हे एक चांगले कीटकनाशक आहे, म्हणून हे नॅप्थॅलीन गोळे घरातील प्रत्येक ठिकाणी ठेवा जेथे पाली जास्त येतात त्या ठिकाणी हे ठेवल्याने वासामुळे पाली पळून जातात. जर तुम्ही अंडी खात असाल तर अंड्याची टरफले डस्टबिनमध्ये टाकण्याऐवजी जिथे पाली येतात तिथे ठेवा. एक-दोन दिवस असे केल्याने पाली निघून जाण्यास मदत होईल.

**मिरचीचा स्प्रे**

स्प्रे बॉटलमध्ये पाणी घेऊन त्यात लाल तिखट टाकून मिक्स करा. तयार केलेला स्प्रे किचन किंवा पाल येते त्या ठिकाणी मारल्यास घरात कधीही पाल येणार नाही. मिरचीच्या वासामुळे पाली घरात येत नाहीत. याशिवाय अंड बनवल्यानंतर ते व्यवस्थित स्वच्छ करून किचनच्या इथे किंवा इतर कोणत्याही ठिकाणी ठेवल्यास घरात पाली येणार नाहीत.

**कडुलिंबाचा स्प्रे**

टोपात पाणी गरम करून त्यात कडुलिंबाची पाने टाकून उकळवून घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाणी थंड करा. थंड झालेले पाणी गाळून स्प्रे बॉटलमध्ये भरून ठेवा. त्यानंतर हा स्प्रे घराच्या कोणत्याही कोपऱ्यात मारल्यास अजिबात पाली येणार नाहीत. घरात सतत जर पाली येत असतील तर कुठेही अन्नपदार्थ उघडे ठेवू नये.

# तुम्हीदेखील रात्री उरलेले अन्न दररोज खाता? जाणून घ्या यामुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम

निरोगी राहण्यासाठी नेहमीच ताजे आणि गरम अन्न खाणे फायदेशीर आहे. पण, आजच्या धावपळीच्या जीवनात काही जण वेळ वाचवण्यासाठी एकाच वेळी जास्त जेवण बनवतात आणि ते फ्रिजमध्ये ठेऊन काही तासांनंतर गरम करून खातात. शिवाय बरेच लोक रात्रीचे उरलेले अन्न फेकले जाऊ नये म्हणून दुसऱ्या दिवशीही खातात. पण, तुम्हाला माहिती आहे का की शिळे अन्न खाल्ल्याने आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. शिळ्या अन्नात हानिकारक बॅक्टेरिया वाढू लागतात, ज्यामुळे शरीरात अनेक समस्या उद्‌भवू शकतात. शिवाय हे अन्न खाल्ल्याने तुमचे पोट खराब होऊ शकते. आज आम्ही तुम्हाला शिळे अन्न खाल्ल्यानंतर आरोग्यावर काय गंभीर परिणाम होऊ शकतो हे सांगणार आहोत.

शिळे अन्न खाण्याचे घातक परिणाम

**विषबाधा**

शिळे अन्न खाण्याचा सर्वात मोठा धोका म्हणजे अन्नातून विषबाधा होणे. खरं तर, जर अन्न शिजवल्यानंतर दोन तासांच्या आत फ्रिजमध्ये ठेवले नाही तर त्यात अनेक बॅक्टेरिया वाढू लागतात, त्यामुळे शरीरात विषारी पदार्थांचे प्रमाण वाढते. असे अन्न खाल्ल्याने अन्नातून विषबाधा होऊ शकते. विशेषतः शिळा भात आणि बटाट्याचे पदार्थ खाल्ल्याने अन्नातून विषबाधा होण्याची शक्यता जास्त असते.



**पचन समस्या**

शिळ्या अन्नात वाढणारे बॅक्टेरिया पचनाच्या समस्या निर्माण करू शकतात. हे बॅक्टेरिया पचन प्रक्रियेवर परिणाम करू शकतात. यामुळे तुम्हाला पोटदुखी, बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त होऊ शकते. कमकुवत पचनसंस्था असलेल्या लोकांनी चुकूनही शिळे अन्न खाऊ नये, यामुळे तुम्हाला पोटाच्या संसर्गाची तक्रारदेखील होऊ शकते.

पौष्टिक कमतरता

जेव्हा अन्न जास्त आचेवर शिजवले जाते तेव्हा त्यातील काही आवश्यक पोषक घटक नष्ट होतात. शिजवलेले अन्न रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्यास त्याची स्थिती आणखी वाईट होते. असे अन्न पुन्हा गरम करून खाल्ल्याने शरीराला पुरेसे पोषण मिळत नाही. तसेच त्यात असलेल्या बॅक्टेरियामुळे शरीरात अनेक प्रकारच्या समस्या उद्‌भवू लागतात.

**उलट्या आणि अतिसार**

जर अन्नातून विषबाधेची समस्या जास्त वाढली तर उलट्या आणि जुलाब होऊ शकतात, त्यामुळे शरीरातून जास्त पाणी बाहेर पडते आणि डिहायड्रेशन होऊ शकते. विशेषतः लहान मुलांना जुलाब लवकर होतात, त्यामुळे उरलेले अन्न पुन्हा गरम करून त्यांना खायला देऊ नये.

**ताप**

शिळ्या अन्नात असलेले हानिकारक जीवाणू शरीरात संसर्ग निर्माण करू शकतात. जेव्हा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती या जीवाणूंशी लढते, तेव्हा शरीराचे तापमान वाढू लागते; यामुळे काही लोकांना तापाची तक्रारदेखील होऊ शकते.

**या शिळ्या गोष्टी खाऊ नका**

शिळे अन्न खाल्ल्याने अनेक आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात. विशेषतः शिळा भात, अंडी, सीफूड आणि प्रक्रिया केलेले अन्न टाळावे. या सर्व गोष्टींमध्ये बॅक्टेरिया लवकर वाढतात, म्हणून या शिळ्या गोष्टी खाणे टाळावे.

**बनवलेले अन्न किती तासांनंतर खाऊ नये?**

आरोग्यतज्ज्ञांच्या मते, अन्न शिजवल्यानंतर लगेच खाणे चांगले आहे. परंतु, जर लगेच हे अन्न खाणे शक्य नसेल तर ते १ ते २ तासांच्या आत खावे. शिजवलेले अन्न ६-८ तासांनंतर खाण्यायोग्य राहत नाही.

■■■

# लग्नाच्या रात्री पुरुषांनी चुकूनही करू नयेत 'या ५ चुका'

लग्नाचे बंधन हे केवळ दोन व्यक्तींचे मिलन नाही तर दोन कुटुंबांचे मिलन आहे. मुलगा असो वा मुलगी, दोघेही लग्नाबद्दल खूप उत्सुक असतात. जीवनाच्या कठीण मार्गावर आपल्या जोडीदारासोबत चालत असताना प्रत्येकाला नवीन आयुष्याची सुरुवात सुज्ञपणे करायची असते.पण कधीकधी इच्छा नसतानाही, अगदी नकळतपणे लग्नाच्या पहिल्या रात्री नवरा मुलगा काही चुका करून बसतो, ज्याचा त्याला आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागतो. चला जाणून घेऊ या त्या चुका कोणत्या आहेत.

**बायकोचा पूर्वेतिहास**

अरेंज्ड मॅरेज असेल तर बायकोला तिच्या भूतकाळाबद्दल विचारू नका. असे केल्याने तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या भावना दुखावू शकता. तसेच काही आवर्जून सांगण्यासारखे असेल तर ते ती स्वतःहून सांगेल. उतावळेपणा न करता संयम ठेवा. एक गोष्ट कायम लक्षात ठेवा की आता तुम्हा दोघांना एकमेकांच्या भूतकाळात नाही तर एकमेकांच्या वर्तमानात तुमचे भविष्य शोधण्याचा प्रयत्न करायाचा आहे.

**लग्नसोहळ्यातल्या कुरबुरी**

लग्नात झालेल्या वादांवर चर्चा करू नका. बऱ्याचदा लग्नात मुला-मुलीचे काका-काकू, किंवा आत्या-मामा एकमेकांवर कोणत्या ना कोणत्या मुद्द्यावर रागावतात, रुसून बसतात. अशा परिस्थितीत या रागाचा तुमच्या नात्यावर परिणाम होऊ देऊ नका. लग्नाच्या पहिल्या रात्री या वादावर अजिबात चर्चा करू नका.

**माहेर किंवा सासरच्या माणसांवर कमेंट करणे**

बायकोच्या पालकांवर किंवा सासरच्या लोकांवर टिप्पणी करू नका. लग्नादरम्यान अनेक वेळा यजमानपद स्वीकारलेल्या वधूच्या कुटुंबांकडून लहानसहान चुका घडतात.

# लेक लाडकी या घरची होणार सून त्या घरची

आईबापाच्या घरी लाडात वाढलेल्या लेकीला एक दिवस आईबापाचे घर सोडून जावे लागणार याची कल्पना असते. मात्र, आई-बापाच्या घरात जे लाड, चोचले पुरविले जातात ते इतर घरात पुरविले जातील काय ? पुरविलेही जातील. मात्र, आईवडिलाच्या घरी हट्ट करतो तसा हट्ट इतरत्र चालणार नाही याची कल्पना लाडाच्या लेकीला नसते. त्यामुळे तिच्या स्वभावामध्ये बदल होणे आणि करणे हे तिच्याच हातात असते. जर तिने स्वत:च्या स्वभावात बदल करुन घेतले नाही तर तिला त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. आईबापाच्या घरात जसे आपण वावरतो तसे सासरी सुद्धा वावरता येते मात्र, सासरच्या माणसांची मनधरणी करून मने जिंकता आली पाहिजेत. जर आपण इतरांची मने जिंकली तरच संसारात जिंकलो, अन्यथा आपल्या संसारात रस नसल्यासारखे निरुत्साही जीवन जगावे लागेल.



त्याकरिता लग्न ठरल्यापासूनच बहुतेक मुलींच्या मनात सर्वांत मोठी भीती असते, ती म्हणजे सासरच्या माणसांशी आपले पटेल की नाही. त्या स्वत:ला सासरच्या वातावरणात मिसळण्याचा प्रयत्न करताततही; पण बऱ्याचदा ते जमत नाही. खरे तर त्यासाठी गरज असते ती आपले विचार व वागणे बदलण्याची.

ज्या कुटुंबात आपण जात आहात तेथील रीतिरिवाज, जीवनशैली स्वीकारायला हवी. त्यासाठी आपला अहंकार बाजूला ठेवायला हवा. बऱ्याच मुद्यांमध्ये आपले मन एखादी गोष्ट स्वीकारु इच्छित नसते. अशावेळी पहिली आपली अडचण समजावून सांगावी व सासरच्यांशी बोलायला त्यांना आपल्यापेक्षा जास्त अनुभव असतो.

कधीही सासर-माहेरात तुलना करु नका. त्यामुळे आपण सुखी राहू शकणार नाही व त्यांनाही खुश करु शकणार नाही. आपल्या विचारात मोकळेपणा आणा व त्या कुटुंबाला पूर्णपणे स्वीकारा.

आपल्या नणंदा व जावांशी स्पर्धा करणे टाळा. त्यामुळे आपण उदास व असंतुष्ट राहाल. नेहमी नव्या नात्यात गैरसमज सहजतेने पसरत जातात. क्षुल्लक गोष्टींना मोठे स्वरुप मिळते व छोट्या गोष्टींचा राईचा पर्वत होतो. हल्लीच्या नववधू सुशिक्षित समंजस असतात. त्यांनी समस्यांबाबत शक्यतो मनमोकळेपणाने बोलायला हवे. आपले विचार स्पष्टपणे पण प्रेमाने व आदराने पटवून द्यायला हवेत.

नव्या नात्यांविषयी जेवढी भीती आपल्या मनात असते, तेवढीच त्यांच्या मनातही असते. तेही आपल्याबाबत तेवढेच असुरक्षित असतात. यासाठी प्रत्येक समस्येची त्यांची बाजू पाहण्याचा प्रयत्न करावा.

आपली सासरची मंडळी आपल्या जीवनाचा भाग होऊ इच्छित असतात. त्यांना आपल्याजवळ येऊ द्या. कोणतेही नाते कळण्यास वेळ लागत असतो. यासाठी स्वत:ला वेळ द्या. घाईगडबीत एखाद्या व्यक्तीबद्दल मत बनवू नका. त्यांनाही महत्वाच्या मुद्याच्या चर्चेत सहभागी करा. त्यांचे मत घ्या. घरातील कोणताही निर्णय स्वत: घेऊ नका. तो घरातील वडीलधाऱ्या मंडळींचा अधिकार आहे.

बहुधा नववधूकडून अनेक अपेक्षा बाळगल्या जातात; पण आपणही माणूसच असल्यामुळे चुका होत असतात. सासरच्यांनी प्रमाणाबाहेर अपेक्षा बाळगल्यास आपल्या पतीच्या सल्ल्याने त्यांना समजावण्याचा प्रयत्न करा.

जर थोडासा वेळ स्वत:ला आणि आपले नाते दृढ व्हायला द्याल तर हे अपरिचित सासर एक दिवस आपले घर होऊन जाईल.


## ग्रामपंचायत न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे
### निविदा नोटीस क्रं. १
### सन २०२५-२०२६

ग्रामपंचायत न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे खालील प्रमाणे कामाचे सीलबंद निविदा जि. पुणे कडील खाली नमूद केलेल्या महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग किंवा जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकादाराकडून २ पाकीट पध्दतीने मागवीत आहे. कोऱ्या निविदाचा नमुना बी १ ग्रामपंचायत न्हावरे कार्यालयात ०७/०७/२०२५ पासून १४/०७/२०२५ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.00 ते दुपारी ५.00 पर्यंत देण्यात येतील व भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दिनांक ०७/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ सकाळी ११.00 पासून ते दुपारी ५.00 पर्यंत स्विकारण्यात येतील. दिनांक १६/०७/२०२५ रोजी ग्रामपंचायत न्हावरे येथे सकाळी ११.00 वाजता किंवा कार्यालयीन सोयीच्या वेळी ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी रक्कम | बयाणा रक्कम इसारा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जाधव चौघुले वस्ती बंदिस्त गटर करणे | ८00000/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | सुबेअ |
| २ | तांबे वस्ती रस्ता कॉक्रिटकरण करणे | ८00000/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | सुबेअ |
| ३ | कोकडेवाडी लक्ष्मीआई मंदिरापुढे सभामंडप | ४९९९१९/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | सुबेअ |
| ४ | कदम वस्ती शौचालययुनिट बांधणे | २७४८५२/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | सुबेअ |
| ५ | तांबेवस्ती जि.प्र.शाळा संरक्षक भिंत बांधणे | ११६२0५/- | ५६0/- | १ % | ६ महिने | खुला |
| ६ | गावठाण वेताळ वस्ती संरक्षक कपाऊड नाना नानी चौक | २६९६९८/- | ५६0/- | १ % | ६ महिने | खुला |
| ७ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती | २0५९७६/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | मजुर |
| ८ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती | २00५0२/- | ५६0/- | सुट पात्र | ६ महिने | मजुर |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१ कोणतीही निविदा रदद करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत न्हावरे यांनी राखुन ठेवला आहे.

२ सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपुर्ण तपशील ग्रामपंचायत कार्यालयात निविदा संचामध्ये पहावयास मिळतील.

३) बयाना रक्कम कोणत्याही पध्दतीने DD/ RTGS द्वारे ग्रामपंचायत न्हावरे यांच्या खात्यावर जमा करुन त्याची पावती किंवा DD लिफाफा क्रं. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रं. २ उघडता जाणार नाही.

४) लिफाफा क्रं. १ तांत्रिक मध्ये ठेकेदार यांचे GST प्रमाणपत्र, पॅन कार्ड, महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग / जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र देण्यात यावे. व लिफाफा क्र. २ मध्ये आर्थिक मध्ये BOQ देण्यात यावे.

५) बयाणा रक्कम निविदा फी अथवा इतर कोणत्याही फी मध्ये सुट असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे तरच फी मध्ये सुट देण्यात येईल.

६) निविदा प्रक्रियेमध्ये सर्व टप्यावर सादर केलेले माहिती खरी असल्याचे १00/- रुपयांच्या स्टॅम्पवर हमीपत्र

सही /-
(श्री. एल. एस. जगदाळे)
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत न्हावरे
ता. शिरुर, जि. पुणे

# कला विश्व




## ‘धुरंधर’चा धमाकेदार फर्स्ट लुक झाला प्रदर्शित!

मुंबई : जिओ स्टुडिओज आणि बी६२ स्टुडिओज यांनी आज रणवीर सिंगच्या वाढदिवसाच्या निमित्ताने २०२५ मधील सर्वात मोठ्या आणि बहुप्रतिक्षित ॲक्शन-थ्रिलर चित्रपट *धुरंधर’* चा धमाकेदार फर्स्ट लुक प्रदर्शित केला आहे. हा चित्रपट ५ डिसेंबर २०२५ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. उरी: द सर्जिकल स्ट्राइक’ सारखा सुपरहिट चित्रपट बनवणाऱ्या दिग्दर्शक आदित्य धर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून रणवीर सिंगसोबत संजय दत्त, अक्षय खन्ना, आर. माधवन आणि अर्जुन रामपाल यांसारखे दिग्गज कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसतील. २ मिनिटे ४० सेकंदाचा हा फर्स्ट लुक रॉ, इंटेन्स आणि हाय-ऑक्टेन ॲक्शनने भरलेला आहे. यात सस्पेन्स, जबरदस्त डायलॉग्स आणि जोरदार ॲक्शन पाहायला मिळते. या चित्रपटाला शाश्वत यांनी संगीत दिले आहे, ज्याचे गायक जैस्मिन सैंडलस आहेत आणि विशेष म्हणजे यात न्यू-एज आर्टिस्ट हनुमनकाइंड यांचाही कोलॅब आहे, ज्यांची हटके स्टाइल या गाण्याला एक नवा फ्लेवर देते. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि बी६२ स्टुडिओज प्रोडक्शनची धुरंधर ही चित्रपट कथा आदित्य धर यांनी लिहिली, दिग्दर्शित आणि निर्मित केली आहे. चित्रपटाची निर्मिती ज्योती देशपांडे आणि लोकेश धर यांनी केली आहे. हा चित्रपट त्या अज्ञात पुरुषांची, अनकही कथा उलगडेल जी आजवर गुप्त राहिली आहे.




## ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ चित्रपटाचा मुहूर्त ठरला; १६ वर्षांनी मांजरेकरांनीची घोषणा

२००९ मध्ये ‘मी शिवाजीराजे भोसले बोलतोय’ हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर भरभरून यश मिळालं होतं. यानंतर जवळपास १६ वर्षांनी महेश मांजरेकरांनी यंदाच्या महाराष्ट्र दिनी ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ या चित्रपटाची घोषणा केली. या सिनेमात छत्रपती शिवाजी महाराजांची प्रमुख भूमिका अभिनेता सिद्धार्थ बोडके साकारणार आहे. तसेच चित्रपटात त्याच्यासोबत बालकलाकार त्रिशा ठोसरही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे; ती यापूर्वी ‘नाळ २’मध्ये झळकली होती. महेश मांजरेकर यांनी आज आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल रखुमाईचं दर्शन घेत, ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आणली आहे. या भव्य चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन महेश वामन मांजरेकर यांनी केलं असून, निर्मितीची धुरा राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी सांभाळली आहे. बहुप्रतीक्षित ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ हा चित्रपट येत्या दिवाळीत प्रदर्शित होणार असल्याची घोषणा आषाढी एकादशीच्या निमित्ताने करण्यात आली आहे. टीझरमध्ये ऐकू येणारे ‘राजे राजे’ हे बोल ज्या ऊर्जेने, ज्या भावनांनी भरलेले आहेत, ते थेट काळजाला भिडतात. सिद्धार्थ बोडकेच्या संवादांमधून केवळ इतिहासाची आठवण होत नाही, तर मनात नवी उमेद, ऊर्जा आणि प्रेरणा संचारते. शिवरायांच्या झंझावाती व्यक्तिमत्त्वाचं आणि त्यागमय नेतृत्वाचं दर्शन घडवणाऱ्या या टीझरमधील दृश्यं आणि संवाद हे अंगावर शहारे आणणारे आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून केवळ ऐतिहासिक पुनरावलोकन न होता, आधुनिक काळातील समाजाला भिडणारा विचारप्रवाह पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लाज वाटली पाहिजे तुम्हाला, महाराष्ट्रातील शेतकरी रोज आत्महत्या करताहेत. त्यांची लेकरं पोरकी होताहेत स्वराज्याचं लखलखतं नाणं होता माझा बळीराजा पण तुम्ही त्याला देशोधडीला लावून महाराष्ट्राच्या नावाला काळीमा फासलाय पण आता बास! जेव्हा जेव्हा महाराष्ट्राला गरज पडणार तेव्हा तेव्हा मी येणार असं सिनेमाच्या टीझरमध्ये सांगितलं जात आहे. ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ या सिनेमात सिद्धार्थ बोडके, सयाजी शिंदे, त्रिशा ठोसर, विक्रम गायकवाड, शशांक शेंडे, विजय निकम, रोहित माने, पृथ्वीक प्रताप, नित्यश्री, सांची भोयर, पायल जाधव, नयन जाधव हे कलाकार झळकणार आहेत. याविषयी दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणतात, शिवाजी महाराज ही केवळ ऐतिहासिक व्यक्तिरेखा नसून ते एक विचार आहेत. हा विचार आज अधिक आवश्यक आहे. ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ हा चित्रपट म्हणजे इतिहासाकडे मागे वळून पाहणं नाही, तर शिवरायांच्या विचारांच्या प्रकाशात आजचा अंधार उजळवण्याचा प्रयत्न आहे. समाजात निर्माण झालेल्या निराशा, उदासीनता, आणि दिशाहीनतेच्या गर्तेत आपण पुन्हा एकदा शिवाजी महाराजांच्या मूल्यांकडे वळणं गरजेचं आहे. हा सिनेमा त्या जाणिवेचा आवाज आहे.

# बा विठ्ठला... बळीराजाला सुखी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर : मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

## आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची महापूजा संपन्न

जनप्रवास : प्रतिनिधी

पंढरपूर : पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले. आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी श्री कैलास दामु उगले, सौ. कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, गृहराज्यमंत्री पंकज भोयर, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

## टेक वारीचा ऑनलाईन शुभारंभ; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून विद्यार्थ्यांच्या एआय प्रकल्पांचे कौतुक

जनप्रवास : प्रतिनिधी

पंढरपूर : पंढरपूर येथील अरिहंत पब्लिक स्कूलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या टेक वारी या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच व्हिडिओ कॉलद्वारे केले. आषाढी एकादशीनिमित्त शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असताना, अरिहंत शाळेने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एक अभिनव पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेले तंत्रज्ञानाधारित प्रकल्प टेक वारी’ या नावाने सादर करण्यात आले.



यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्याकडून प्रकल्पांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी एआय वापरून तयार केलेल्या उपकरणांचा वापर दैनंदिन जीवनात आणि विशेषत: पंढरपुरात येणाऱ्या वारकऱ्यांसाठी कसा करता येईल, यावरही चर्चा झाली.

स्वयंचलित वर्ग, खोल्या स्मार्ट हजेरी, ऊर्जा कार्यक्षम यंत्रणा वगैरे प्रकल्पांचे उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केलं. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांना हे प्रकल्प ग्रामीण भागातील शाळांमध्ये कसे राबवता येतील या संदर्भात अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी होते. यावेळी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक आणि प्रकल्पात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## मतदार याद्यांतील गैरप्रकार रोखण्यास काँग्रेसची समिती; अध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण अहवाल देणार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये विविध मार्गाने गैरप्रकार करून भाजपाने विजय मिळवला आहे, हे उघड झालेले आहे. निवडणूक आयोगाला हाताशी धरून भाजपाने चोरीच्या मार्गाने सत्ता मिळवली. पण, यापुढे असे प्रकार होऊ नयेत, ते कसे रोखता येतील, यावर उपाय सुचवण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक समिती गठीत केली आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ७ सदस्यांची ही समिती असून या समितीत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव प्रफुल्ल गुडदे पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश शर्मा, विधानसभेचे उमेदवार धनंजय शिरीष चौधरी, परिक्षित विरेंद्र जगताप हे सदस्य आहेत तर प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अभय छाजेड हे समन्वयक आहेत.



मतदार याद्यांमधील गैरप्रकाराबाबत काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे रितसर तक्रार दाखल केलेली आहे. पण, आयोगाने अद्याप समाधानकारक खुलासा केलेला नाही. भाजपा निवडणुका जिंकण्यासाठी गैरमार्गाचा वापर करत असून मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळे केले जात आहेत. हे सर्व रोखण्यासाठी ही समिती अभ्यास करून प्रदेश काँग्रेसला अहवाल सादर करेल, अशी माहिती देण्यात आली आहे.

## राज ठाकरे बडव्यांच्या कडेवर बसले; मंत्री प्रताप सरनाईकांचं एकनाथ शिंदेंना भावनिक पत्र

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांवर हिंदी भाषा शिकण्याची सक्ती केली होती. तसेच सरकारने त्रिभाषा सूत्र स्वीकारलं होतं. मात्र, राज्यातील मराठी जनतेने या निर्णयाचा विरोध केला. शिवसेना (ठाकरे) व मनसे या दोन्ही पक्षांच्या प्रमुखांनी आंदोलनाच्या दिवशी विजयी मेळाव्याचं आयोजन केलं होतं त्यावरून शिवसेना (शिंदे) नेते व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिलं आहे.

या पत्रात म्हटलं आहे की शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षाची विजयी वाटचाल चालू आहे आणि आपण मुख्यमंत्री असताना आपल्या संकल्पनेतून चालू झालेल्या अनेक कल्याणकारी योजना यशस्वीपणे राज्यात चालू आहेत. महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत मोठ्या उंचीवर जात आहे. पण आपल्या राज्यात, गेले काही दिवस मराठी भाषेचे निमित्त करुन स्वार्थी राजकारण पुन्हा एकदा सुरू झाले आहे, त्याबाबत माझ्या भावना पत्रातून व्यक्त केल्या आहेत. मला माझ्या भावना या पत्रातून व्यक्त करावाव्याशा वाटल्या.

प्रताप सरनाईक म्हणाले, मराठीच्या हितासाठी आम्ही एकत्र येत आहोत असे उबाठा गट, मनसे सांगत आहेत. मग काही वर्षांपूर्वी हे लोकं वेगळे कोणाच्या हितासाठी झाले होते? मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी संस्कृती यांच्याविषयी त्यांना काडीचे प्रेम नाही, केवळ मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर डोळा ठेवून ही मंडळी एकत्र येत आहेत हे सुज्ञ जनता ओळखून आहे. राक्षसाचा जीव पोपटात असतो अशी एक लोककथा मराठीत आहे. यांचा जीव महापालिकेत अडकलेला आहे. महापालिकेच्या तिजोरीत यांचा आत्मा आहे. शनिवारी वरळी येथे झालेल्या मेळाव्यात त्यांचा स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडाच पहायला मिळाला. सत्ता गेल्यामुळे ते किती अगतषक झाले आहेत याची प्रचिती उभ्या महाराष्ट्राला पदोपदी येत आहे. उबाठाचे राजकारण अत्यंत खोटारडे, स्वार्थी आणि विश्वासघातकी आहे. त्यामुळेच त्यांचा एक एक सहकारी त्यांना सोडून जात आहे.

## ठाणे - घोडबंदर मार्ग पुढील पाच दिवस वाहतुकीसाठी बंद

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई, पालघर आणि गुजरात भागातील वाहतुकीसाठी घोडबंदर मार्ग महत्त्वाचा मानला जातो. या मार्गावरील मेट्रो प्रकल्पाचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरु असून कापूरबावडी येथील खांबांवर गर्डर बसवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या दरम्यान पोलिसांनी घोडबंदर मार्गावरील ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक पाच दिवस बंद असण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याची अंमलबजावणी काल पासून करण्यात आली आहे. दरम्यान या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या वतीने कासारवडवली भागात सुरू असलेल्या मेट्रो ४ च्या कामाकरिता डोंगरीपाडा येथे स्टील गर्डर मल्टीएक्सेल वाहनावर चढविण्यात येणार असून त्यासाठी अवजड वाहने मुख्य रस्त्यावरून विरुद्ध दिशेने एक बाजूने सोडण्यात येतील. तसेच ठाणे-घोडबंदरवरून विरुद्ध दिशेने नळपाडा व कापुरबावडी येथे स्टील गर्डरची वाहतूक करण्यात येणार आहे.

## पुणे पोलीस दलात लवकरच एक हजार पोलीस कर्मचारी; उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची माहिती

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पोलीस भरतीत निवड झालेल्या वीस हजार उमेदवारांचे सध्या प्रशिक्षण सुरू असून, लवकरच त्यापैकी किमान एक हजार उमेदवारांना पुणे पोलीस दलात सहभागी करून घेतले जाईल अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज दिली.

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या आमदार निधीतून सिंहगड रस्ता पोलीस स्टेशन अंकित विठ्ठलवाडी येथील ’आनंदनगर पोलीस चौकी’च्या इमारतीचे लोकार्पण करताना पाटील बोलत होते.




राज्यमंत्री मिसाळ, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, उपायुक्त संभाजी कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईगडे, दीपक मिसाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वीरेंद्र केळकर, कीर्ती कुंजीर, मिथुन होवाळ यावेळी उपस्थित होते.

ना. चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरातील वाहनांची संख्या ही वाढत आहे. या दोन्ही गोष्टी आपल्या नियंत्रणात नाहीत. शहरातील कायदा सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी आणि वाहतुकीची कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि पोलीस यांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे.

मिसाळ म्हणाल्या, राजाराम पूल परिसरात पुणे शहर पोलिसांची हद्द संपत होती. त्यामुळे या भागातील नागरिकांना ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील हवेली पोलीस स्टेशनमध्ये जावे लागायचे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी हद्द वाढवून घेतली आणि आरक्षित असलेल्या दोन जमिनीवर पोलीस स्टेशन आणि पोलीस चौकी बांधण्याचे काम सुरू केले. आज पोलीस चौकीचे लोकार्पण झाले असून दोन महिन्यांमध्ये पोलीस स्टेशनचे कामही पूर्ण होईल.

आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, गृह विभागाने पुण्यासाठी सात नवीन पोलीस स्टेशनला मंजुरी दिली आहे. मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही यंत्रणेसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. पोलीस दलात मनुष्यबळ ही वाढवले जात आहे. त्यामुळे पुणे पोलिसांच्या क्षमता वाढत असून, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करू.

* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com